परस्परं भावयन्तः
म प्र

# हितगुज

मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

श्रद्धांजली विशेषांक



श्री. सीताराम गोपाळ खांबेटे

अंक १३२ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ डिसेंबर २०२२

Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

*प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना*
*माझा स्नेहपूर्वक नमस्कार.*

सन २०२२ मधला डिसेंबर हितगुजचा हा शेवटचा अंक सरत्या वर्षाला जड अंत:करणाने निरोप द्यायचा आणि येणाऱ्या नव वर्षाचे आनंदाने स्वागत करायचे. मावळत्या दिनकराला अर्घ्य द्यायचे, अस्तास जाणाऱ्या सूर्याला निरोप द्यायचा. उद्या उगवणारच! म्हणून उगवत्या सूर्यदेवाला नमस्कार करून हात जोडायचे, प्रार्थना करायची. आपल्या सर्व कपीगोत्री परिवाराला येणारे नवीन वर्ष समृद्धीचे, आरोग्यपूर्ण, सुखासमाधानाचे जावो!

मंडळी, वाईट वाटते की या नवीन वर्षाचे स्वागत करायला, आपले प्रिय कुलबांधव सी. गो. आपल्यात नाहीत. मराठे प्रतिष्ठानची आणि आपली सर्वांची साथ सोडून ते लांब अनंताच्या प्रवासाला कायमचे निघून गेले. कधीही न परतण्यासाठी. करोना काळानंतर आपण सर्व सण गणपती, नवरात्र, दिवाळी धुमधडाक्यात साजरी केली. आपली ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ही मराठ्यांच्या इतमामाला शोभेल अशी दि. ६ नोव्हेंबरला दादर येथे स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात संपन्न झाली. यावेळी सी. गों.ची आठवण प्रत्येक मराठे सदस्याला तीव्रतेने झाली. एखाद्या व्यक्तीचे वैयक्तिक महत्त्व जाणणे आणि संस्थात्मक मूल्य जोखणे यात महद्अंतर असते. संघटनशक्तीचा अदमास सगळ्यांनाच कळतो असेही नाही पण मराठे प्रतिष्ठानच्या उभारणीत योगदान देण्याची क्षमता असलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे आपले सी. गो. खांबेटे असे मी प्रामाणिकपणे नमूद करते. 'हितगुज'च्या माध्यमातून मराठे परिवारासाठी नवीन उपक्रमांसाठी 'मराठे परिवार कट्टा' त्यांनी स्थापन केला होता. ... कट्ट्याप्रमाणे स्थानिक पातळीवर नियमितपणे काही छोटे-मोठे कार्यक्रम आखावेत. संवाद गट असावा. मराठे परिवारातील जर कुणाचे घर मोठे असेल तर तेथेही कार्यक्रम घ्यावा. स्थानिक उपक्रमांना 'हितगुज'मधून नुसती प्रसिद्धीच नाही तर सक्रिय मार्गदर्शन आणि सहाय्यही मिळू शकेल अशा त्यांच्या चांगल्या योजना होत्या. नवीन कार्यकर्ते तयार होण्यासाठी मेळावे घ्यावे यासाठी ते कायम प्रयत्नशील होते. दुर्ग (कारगिल) उडीपी संमेलन यशस्वी करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. या संमेलनाच्या निमित्ताने 'वंश' स्मरणिका त्यांनी प्रकाशित केली होती. सी. गो. ना काही येत नाही, असे ते नव्हतेच. ते लेखक होते, संपादक होते, प्रकाशक होते. उत्तम मुद्रक होते. कोणताही विषय त्यांना वर्ज्य नव्हता. चौफेर वाचन, आकलनशक्ती उत्तम होती. 'संपादिका' म्हणून मला ते नेहमी प्रोत्साहन देत असत. मी लिहिलेल्या 'संपादकीय'चं कौतुक करीत असत. सर्व हितगुज मासिकातल्या 'संपादकीय'चं पुस्तक काढू असा आग्रह त्यांचा असे. 'संपादकीय'मधून तुम्ही चांगले विचार मांडता म्हणून ते वाचनीय होत. तुम्ही तुमचा प्रबंध प्रकाशित करा, मी डिटीपी करून देईन, असं म्हणत. पण मी काही मनावर घेत नाही याचं

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ९८२०२३२०८२ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

त्यांना वाईट वाटत असे. असो.

हा डिसेंबर हितगुजचा अंक श्रद्धांजली विशेषांक म्हणून काढीत आहोत. या अंकात सौ. निलांबरीताई, श्री. मोहनराव यांचे सी. गों. ना श्रद्धांजली वाहाणारे लेख प्रकाशित करीत आहोत. सी. गों. च्या कन्येने लिहिलेला भावपूर्ण लेख हा उत्कृष्ट मृत्यूलेखांचा आदर्श ठरावा, अशा योग्यतेचा आहे. सी. गो. गेल्यामुळे मराठे परिवाराची कधी न भरून येणारी हानी झाली आहे. त्यांनी मराठे प्रतिष्ठानसाठी जे योगदान दिले, त्याला तोड नाही. मराठे परिवारासाठी सी. गों. ना अपेक्षित असलेले कार्य पुढे नेटाने करणे हीच सी. गों. ना खरी श्रद्धांजली ठरेल!

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),
(दि. १० नोव्हेंबर, २०२२)
भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२/८४३३६ ७४८२७

# मराठे प्रतिष्ठान आयोजित घरगुती गणेश सजावट स्पर्धा २०२२

**या वर्षी आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत एकूण ८ कुलबांधव सहभागी झाले.**
**योग्य प्रकारे परीक्षण करून तीन क्रमांक काढण्यात आले.**



**शशांक मराठे,**
*प्रथम क्रमांक*



**मयुरेश मराठे,**
द्वितीय क्रमांक



**पुरुषोत्तम मराठे,**
तृतीय क्रमांक

विजेत्यांना पारितोषिकांची रक्कम बँक खात्यामध्ये पाठवण्यात आली आहे. तीनही विजेत्यांचे हार्दिक अभिनंदन!



## सुगरणीचा सल्ला

- गाजर, मटारसारख्या भाज्या उकडल्यावर लगेच थंड पाण्याखाली धराव्यात. यामुळे त्यांचा रंग निघण्यापासून रोखता येतं.
- हिरव्या भाज्या उकडताना त्यात चिमूटभर खाण्याचा सोडा घालावा. यामुळे त्यांचा ताजा हिरवा रंग तसाच राहतो.
- पालेभाज्या, कोथिंबीर किंवा फ्लॉवर स्वच्छ धुण्यासाठीच तसंच त्यातील कीड वगैरे निघून जाण्यासाठी या भाज्या धुताना पाण्यात थोडसं मीठ किंवा व्हिनेगर टाकावं.
- ग्रेव्ही असणाऱ्या भाजीत किंवा आमटीत मीठ जास्त पडलं, तर कच्च्या बटाट्याचे तुकडे त्यात टाकावेत. १५ मिनिटांनी ते कांदा भाजी – आमटीतील जास्तीचं मीठ हे बटाटे शोषून घेतात.

# भगवत् गीता

• मोहन सदाशिव मराठे (पृ.३६५) खार-मुंबई भ्रमणध्वनी : ९८१९९६४७६५

**कौ**रव, पांडव युद्धाला उभे राहिले असता (चुलत) बांधवांना युद्धात मारून व कौरव, पांडव दोन्ही कुळांचा समूळ नाश करून काय मिळवणार अशा विचाराने अर्जुन गर्भगळित झाला व आपले गांडीव धनुष्य टाकून रथातून उतरला, अशा वेळी भगवान श्रीकृष्णांनी त्याला जो हितोपदेश केला तो भगवत गीता हा सर्वात महत्त्वाचा धर्मग्रंथ मानला जातो. माझ्या मते ह्या सोप्या धर्मग्रंथाला आपण अगदी क्लिष्ट-गहन करून टाकलेला आहे. थोड्या अतिशयोक्तीचा दोष पत्करून असे सांगता येईल की, एका वकीलाने महाभारताला मालमत्तेचा वाद म्हटले आहे तर रामायणाला स्त्री अपहरणाचे प्रकरण म्हटले आहे. ह्यातील मत वरवरचे घेतले तरी माझ्या मते सोप्या गीता तत्त्वज्ञानाला आपण अवघड कोंदणात अडकवून ठेवले अहे. वास्तविक भगवान श्रीकृष्णांनी अमर धर्मतत्त्व सांगितले आहे. हा धर्म सनातन वैदिक, हिंदु, मुस्लीम, ख्रिश्चन इ. कोणताही नसून मानवधर्म आहे. समाजधारणा, समाज नियमन ह्यासाठी मानवाला त्याची कर्तव्ये ठरवून देण्यात आली आहेत. ती कर्तव्ये पार पाडण्याचा त्याला (जन्मसिद्ध) अधिकार आहे आणि तो त्याने वापरलाच पाहिजे. हे करताना त्याने फळाची अपेक्षा करू नये असे गीतेत म्हटल्याचे वारंवार सांगितले जाते. माझ्या अल्पबुद्धीला हे चुकीचे वाटते. सामान्य व असामान्य माणसे फळाची अपेक्षा करूनच कामे करतात. मुले चांगली निघावी म्हणून मातापिता संगोपनाचे कर्तव्य पार पाडतात. परीक्षेत पास व्हावे म्हणून विद्यार्थी अभ्यास करतात. प्रपंच चालावा म्हणून माणसे उद्योग व्यवसाय करतात. लो. टिळक स्वराज्यासाठी झटतात, तेव्हा ह्यात चूक काय आहे? आणि गुन्हा तर मुळीच नाही. माझ्या मते भगवान श्रीकृष्णांनी हे बजावले आहे की, फल मिळणे हे तुझ्या हातात बिलकुल नाही. अर्जुनालाही त्यानी युद्धात मृत्यू झाल्यास तुला स्वर्गप्राप्ती होईल आणि जिंकल्यास पृथ्वीचा उपभोग घेशील असे म्हटले. भगवत गीतेचा प्राकृतात अर्थ सांगताना ज्ञानेश्वरांनी पसायदानाने समारोप केला आहे. माझ्या मते गीतेचा सर्वात सोपा भावार्थ तुकोबांनी 'शेवटचा दीस व्हावा गोड, म्हणोनी केला अट्टाहास' ह्या श्लोकात दिला आहे. कर्तव्यपूर्ती-मानवधर्माचे पालन केल्यास शेवटचा दीस गोड होणारच. माझ्या मते गीतेची ही शिकवण त्याला संपूर्ण मानवधर्माचा ग्रंथ होण्याइतकी मोठी व महत्त्वाची आहे. गीतेचा



आपण त्या दृष्टीने प्रसार केला पाहिजे. यु. नो. चे सेक्रेटरी जनरल (१९५०-५५) DAG HAMMARSKJOLD (स्वीडीश) ह्यांनी गीतेची सर्वश्रेष्ठ धर्मतत्त्वज्ञान म्हणून मुक्तकंठाने स्तुती केली होती. गीतेतील आणखी एका मुद्यावर मी विचार मांडतो. आत्मा ह्या मुद्यावर गीतेत पुष्कळ खल केलेला आहे. आत्मा कुणालाच सिद्ध करून दाखवता येत नाही, तो अमर आहे. त्याला अग्नी जाळू शकत नाही. वारा त्याला गिळू शकत नाही. शस्त्राने त्याचे तुकडे पडत नाहीत. पाणी भिजवू शकत नाही. माझ्या मते ह्याचे सोपे उत्तर आहे आत्मा. म्हणजे जिन्स = पेशी. मानवाच्या कोट्यावधी वर्षात स्त्री-पुरुष संयोगात जिन्स संततीकडे ट्रान्स्फर होतात. आजच्या प्रत्येक मानवात ह्या कोट्यावधी जिन्सचे मिश्रण आहे. माणूस मरण्याआधीच हे मिश्रण संततीत झालेले असते. तेव्हा ते संपण्याचा प्रश्न येतो कुठे? आणि मानवजातच नष्ट झाली तर आत्मा नवीन कोणत्या देहात (जुना टाकून) प्रवेश करणार? ह्याचा एक महत्त्वाचा निष्कर्ष आहे की पुनर्जन्माची कल्पना माता-पित्याकडून संततीत जिन्सचे ट्रान्स्फर हाच अर्थ घेतला पाहिजे. मानवधर्माचा पाया सहकार धर्म आहे. दोन्ही अविभाज्य आहेत.

फलाची अपेक्षा न करता कर्म करावे ह्या गीतार्थाने अकारण क्लिष्टता निर्माण केली आहे. असे म्हटलेले नाही. त्यापेक्षा, कर्म करा, फलाची अपेक्षा करा पण त्याचबरोबर फळ मिळेलच असा तुम्हाला दावा करता येणार नाही. त्यावर तुमचा अधिकार नाही हे पक्के समजून चाला हे सांगणे सर्वसामान्यांना समजणारे आहे पटणारे आहे व ते त्यांना गीतेच्या जास्त जवळ जाणारे आहे व हे गीता धर्म प्रसारास मदत करणारे ठरेल हा संदेश सर्व मानवजातीला समजण्यासारखा, समजावण्यासारखा आहे.

# स्त्रियांच्या जाणीवा आणि वेदना शब्दबद्ध करणाऱ्या कथा

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०), वडाळा दूरध्वनी – ९८२०२३२०८२

**का**हीसं आगळं-वेगळं लेखन करणाऱ्या कथालेखिका म्हणून नीरजा यांनी मराठी वाङ्मयात आपलं विशिष्ट स्थान निर्माण केलं आहे. स्त्रीमनातील सूक्ष्म, तरल आणि विविध स्पंदने आपल्या सरळ, ओघवत्या भाषेत टिपणारी ही लेखिका आहे.

'जे दर्पणी बिंबले' या त्यांच्या कथासंग्रहात एकूण १० कथा आहेत. त्यातील अनेक कथा, अनुष्टुभ दिवाळी अंकात, आकंठ दिवाळी अंकात, कालनिर्णय अंकात प्रसिद्ध झालेल्या आहेत.

पहिली कथा 'जवळ तरी दूर'- या कथेतील माई आणि आपण यांचा मने न जुळलेला 'खोटा' संसार, अप्पांना लग्न करायचे नव्हते. ब्रह्मचारी राहण्याची शपथ घेतली होती. देशासाठी जगायचे होते त्यांना. पण त्यांच्या आईबाबांनी हातातून पोरगा जातो की काय या भीतीने जबरदस्तीने माईशी लग्न लावून दिले. पण मोठं व्हायला जे गुण लागतात ते काही अप्पांच्यांत नव्हते. सगळ्या शपथा वाऱ्यावर विरून गेल्या.

संयम आणि ब्रह्मचर्य त्यांन पाळता आले नाही. म्हणून मग माईचा राग, तिटकारा का तर त्या मोहात पाडतात. माई म्हणजे त्यांना त्यांच्या साध्या पासून दूर नेणारी मायावी चेटकीणच वाटते. म्हणून माईशी अबोला, आप्पासारख्या नवऱ्याकडून माईच्या वाट्याला उपेक्षा आणि अवहेलनेचे जीणे आले. माईने संसारात क्लेष भोगले. पण शाम आणि दिलीप या पोरांसाठी ती जिद्दीने उभी राहिली. मोठ्या उमेदीने हिमतीने तिने तिचे व्यक्तिमत्त्व साकारले. तिचा मुलगा दिलीप आप्पांचीच परंपरा चालवितो की काय? आईला सोसावे लागलेले दुःख आणि वेदनांची पुनरावृत्ती नव्याने या घरात सुरू होणार की काय, या विचाराने बेचैन झालेली माधवी 'जवळ तरी दूर' या कथेत भेटते.

'काळस्पर्श' ही या संग्रहातील उत्कृष्ट कथा. दिदीला लिहिलेल्या पत्रातून भावनांना मोकळी वाट करून दिली आहे. 'स्मशानवास' कथेत, कावेरी काशीनाथबरोबर लग्न करून रहायला येते. पण त्याची स्मशानातली नोकरी आणि स्मशानातच असलेले घर, मुडद्यांचे कुबट वास, कावेरीला शिसारी येते, तिथे राहण्याचा उबग येतो. बाळंतपणासाठी ती सासरी जाते, किरणला घेऊन पुन्हा स्मशानातील घरात नांदण्यासाठी येते. तिला फार अवघड जाते. नाईलाजाने, निरुपायाने ती येते. दुर्दैवाने किरणचा मृत्यू होतो. काशीनाथ किरणला स्मशानात पुरतो. एकदा कावेरीच्या मनात येते की या घाणेरड्या स्मशानातून किरणचे प्रेत उकरून काढायचं आणि स्मशानापासून दूर कुठेतरी चांगल्या स्वच्छ, सुंदर जागी त्याला पुरायचं, या हेतूने ती स्मशानात काम करणाऱ्याला घेऊन येते. पण स्मशानातलं नंदनवन झालेलं बघून थक्कच होते. स्मशानाच्या दोन्ही बाजूंना हिरवळ, फुलांचे ताटवे, जाई-जुईचे मांडव, आंबा, केळी, नारळ या झाडांमुळे भर उन्हातनही आलेली सावली, मोकळं, स्वच्छ सुंदर आणि प्रसन्न वातावरण बघून ती उत्साहित होते. आणि स्मशानाचं हे नंदनवन, तिच्या नवऱ्याने, काशीनाथने केलेले पाहून त्याच्याविषयी तिचे प्रेम भरून येते.

साहचर्य आणि विश्वासातून प्रेम फुलते. परस्परांवरील विश्वास उडाला की प्रेमाला तडा जातो व संसार उद्ध्वस्त व्हायला वेळ लागत नाही. म्हणून आपल्या नवऱ्याला, यशला मोकळेपणी पत्र लिहून, हातून नकळत झालेली चूक प्रांजळपणे कबूल करणारी आणि तो क्षमा करील याची वाट पाहात राहणारी रेणू 'कन्फेशन' कथेत भेटते. विवेक आणि मीनाक्षीच्या घटस्फोटाचे कारण मीता कशी ठरते हे 'चौकट' कथेतून पाहायला मिळते; तर गुरुदक्षिणा म्हणून सरांची सर्व सेवा मनोभावे करणारा दीप आणि त्याच्यावर मुग्ध प्रेम करणारी सरोज 'मरणगंध' कथेत भेटते.

स्त्रीजीवनातील नाजूक समस्या कशा गुंतागुंतीच्या असू शकतात याचा प्रत्यय या कथा वाचताना येतो. स्वतःच्या जगण्याचा अर्थ शोधू पाहणाऱ्या या स्त्रिया आहेत. आत्मसन्मानाचे व स्वसामर्थ्याचे भान जपणारी, आधुनिक संवेदनशीलता असलेली स्त्री हा या कथांचा मध्यवर्ती बिंदू आहे. नीरजा यांच्या सूक्ष्म व सर्वंकष अवलोकनाचे, बारीक तपशिलाचे कौतुक करावेसे वाटते. लेखिका 'पाऊसवेडी'. या पावसाचा उपयोग कथांमध्ये वातावरणनिर्मितीसाठी लेखिकेने उत्तम रीतीने केला आहे.

**जे दर्पणी बिंबले**; लेखक : नीरजा धुळेकर
मॅजेस्ट्रिक प्रकाशन, मुंबई
मूल्य : १५०/-; पृष्ठसंख्या : १९४

# सिंधु संस्कृतीचा परत ऱ्हास?

• सौरभ मराठे (पृ.३१६), पुणे    भ्रमणध्वनी – ९८६०५६१११३

या महिन्यात पाकिस्तानमध्ये प्रचंड पाऊस झाला आणि इतिहासाची पुनरावृत्ती होते, की काय असे वाटू लागले. जगाच्या नकाशावर आपले अद्वितीय असे स्थान प्राप्त झालेले 'मोहेंजोदडो' धोक्यात दिसत होते! संयुक्त राष्ट्राचे सहसचिव या जागेस भेट देण्यासाठी आले. जगाचे लक्ष वेधून घेणारी ही घटना अत्यंत महत्त्वाची आहे. नेमके काय आहे या जागेमध्ये?

गोष्ट आहे, साधारणपणे १५०-२०० वर्षांपूर्वीची. सिंधू संस्कृती नामक संस्कृती कुठे अस्तित्वात होती. त्याची कल्पनाही फार कुणाला नव्हती. इजिप्शियन, मेसोपोटेमियनसारख्या बलाढ्य संस्कृतीविषयी थोडी फार माहिती जनमानसांत होती. याच काळात भारतावर ब्रिटिशांचे राज्य होते. दळणवळणाची चांगली सोय व्हावी या उद्देशाने संपूर्ण देशात रेल्वेचे जाळे विणण्याचे काम सरकारने हाती घेतले होते. सध्याच्या पाकिस्तानात असलेल्या भागात रावी नदीजवळ लाहोर ते मुलतान लोहमार्ग टाकण्याचे काम या अंतर्गत हाती घेण्यात आले. या सिंधू खोऱ्यात दगड काही सहज मिळेना. जवळच असलेल्या काही ओसाड गावांमध्ये पडकी घरे आहेत, असे लक्षात आले. त्या पडक्या घरांच्या विटा या लोहमार्गाच्या कामासाठी वापरण्यात आल्या. ज्या विटा वापरात आणल्या जात होत्या, त्या काही हजार वर्षांपूर्वी घडवल्या होत्या, याची पुसटशीही कल्पना कुणाच्या मनात त्या वेळी आली नाही. जमेल तेवढ्या विटा वापरल्या गेल्या. त्यात ज्या शिल्लक राहिल्या त्या पुढे उत्खनन झाल्यावर किती महत्त्वाच्या होत्या, हे जगासमोर आले.

सन १८५६ मध्ये हडाप्पा या गावाजवळ काही प्राचीन वस्तू सापडल्या; पण त्याचे महत्त्व त्या काळातही लक्षात आले नाही; पण पुढे १९२१ च्या सुमारास या भागाचे उत्खनन केले गेले आणि सिंधू संस्कृतीचा शोध लागला. हडाप्पामध्ये उत्खनन झाल्यामुळे सुरुवातीच्या काळात या संस्कृतीला 'हडाप्पा' संस्कृती म्हणूनही ओळखले गेले. जगाचे डोळे दीपवून टाकणारी ही संस्कृती इजिप्त आणि मेसोपोटेमियाइतकीच प्राचीन आणि काही बाबतीत त्यांच्यापेक्षाही प्रगत होती हे जगासमोर आले. अकस्मात सापडलेल्या हडाप्पाप्रमाणे 'मोहेंजोदाडो'चा शोधही असाच अचानक लागला, असे म्हणता येऊ शकेल.



सिंधू नदीच्या काठावर हे शहर वसलेले होते. या गावातील टेकड्यांना 'मोहेंजोदाडो' म्हणजेच 'मृतांची टेकडी' म्हणून ओळखले जात होते. १९२० मध्ये या जागेचा शोध लागला. १९२१ मध्ये या जागेवर उत्खनन जसे खोल होत गेले, तसे अनेक अवशेष सापडू लागले. याच सुमारास हडाप्पा येथेही उत्खनन होत होते आणि त्या उत्खननात सापडणाऱ्या अवशेषांमध्ये साधर्म्य आढळून येत होते. म्हणजेच ते एका काळातले होते असेच म्हणता येऊ शकेल. सर जॉन मार्शल यांनी पाच वर्षे उत्खनन करून 'मोहेंजोदाडो'चा वृतांत जगासमोर सादर केला. पुढे १९२७-३१ आणि १९५० मध्ये या परिसरात आणखी उत्खनने करण्यात आली आणि सिंधू संस्कृती जगासमोर आली.

साधारण पाच किलोमीटरचा परीघ असलेल्या या भागात अनेक गोष्टी सापडल्या. त्यात काही कोटाचे अवशेष होते, तर काही नागरी वस्तीचे. हडाप्पाप्रमाणेच आखीवरेखीव आणि योजनाबद्ध अशी नागरी वस्ती येथे उत्खननात दिसून आली. भाजलेल्या विटांचा वापर करून बांधकाम केलेले निदर्शनास आले. नागरी वस्तीभोवती पक्का असा कोट बांधण्यात आला होता. ठिकठिकाणी त्याला बुरूजही बांधलेले दिसून येतात. गावातील रस्ते हे पूर्व-पश्चिम आणि उत्तर-दक्षिण असे आखलेले दिसून येतात. भट्टीत भाजलेल्या पक्क्या विटांचा वापर करून घरे बांधलेली होती. घराचा दरवाजा मुख्य रस्त्यावर न येता मुख्य

रस्त्याला जोडणाऱ्या छोट्या गल्ल्यांकडे येत असल्याचे दिसून आले. काही घरे तर दुमजली बांधलेली दिसून आली. एकूणच, नगर नियोजन सुनियोजित, सुबद्ध होते. शास्त्रशुद्ध पद्धतीने जलनि:सारणाची व्यवस्था या नगरीमध्ये होती. उत्कृष्ट बांधणीची गटारेही उत्खननात सापडली. ही गटारे उघडी नसून, विटांनी झाकलेली होती आणि गटारातील सांडपाणी, घाण व्यवस्थित आणि लवकर वाहून जावी, अशी पद्धतीने नियोजली होती.

मोहेंजोदाडोमधील अद्वितीय गोष्ट म्हणजे उत्खननात सापडलेले स्नानगृह. हडप्पाप्रमाणे 'मोहेंजोदाडो' मध्येही रंगीत मडकी सापडतात. गुलाबी रंगाची मडकी येथे सापडली आहेत. काळ्या रंगाने केलेले चित्रकाम या मडक्यांवरही दिसून येते. त्याचबरोबर वैशिष्ट्यपूर्ण मुद्रा येथे सापडल्या. अनेक प्रकारचे प्राणी या मुद्रांवर दिसून येतात. त्या काळातील लोक अनेक प्रकारचे दागिने वापरत असावेत. येथे सोन्याचे अलंकार सापडलेच; शिवाय मौल्यवान दगडांच्या मण्यांचाही वापर केला जात होता हेही दिसून आले. मातीच्या मूर्ती, खेळणीही उत्खननात होती. थोडक्यात, त्या काळातील जीवनावर प्रकाश टाकणारे अनेक अवशेष 'मोहेंजोदाडो'मधून उपलब्ध झाले आहेत.

या दोन संस्थानांच्या शोधांनंतर सिंधू संस्कृतीवर मोठ्या प्रमाणात संशोधन केले गेले. सिंधू संस्कृतीची महत्त्वाची ठिकाणे म्हणजेच हडाप्पा आणि मोहेंजोदाडो ही दुर्दैवाने भारताच्या फाळणीनंतर पाकिस्तानात गेली. त्यानंतर भारतातही अनेक स्थाने शोधली गेली. ढोलविरा, लोथल, राखीगढी ही त्यापैकी काही महत्त्वाची ठिकाणे. मोहेंजोदाडोचा समावेश १९८० मध्ये जागतिक वारसा स्थळांमध्ये करण्यात आला. जागतिक स्तरावर नोंद झाल्यापासून मोहेंजोदाडोच्या जतन आणि संवर्धनाकडे सर्वांचेच लक्ष होते. आंतरराष्ट्रीय सुरक्षेचा हा विषय त्याच वर्षीपासून बनला होता. उत्खनन झाले त्या वेळी उभ्या असलेल्या विटांच्या भिंती त्या मानाने सुरक्षित आणि बऱ्यापैकी चांगल्या अवस्थेत होत्या; परंतु काही काळातच त्यांच्यावर क्षार जमा होत असल्याचे दिसून येऊ लागले. विटांवर जमा होणारे क्षार तिच्या नुकसानीस कारणीभूत ठरत होते. सोडियम सल्फेटचा हा प्रभाव असल्याचे दिसून आले.

त्याचबरोबर सतत धोका दिसून येत होता तो म्हणजे सिंधू नदीचा. नदीचे पात्रही बदलले आहे. मोहेंजोदाडोच्या पूर्वेस असलेली ही नदी पात्र बदलत हळूहळू पश्चिम दिशेस सरकत असून, ती वस्तीच्या अवशेषांजवळ येत असल्याने पुराचा धोका या स्थानाला असल्याचे निदर्शनास आले होते. १९९१ मध्ये या सर्व गोष्टींकडे लक्ष देण्यासाठी उपाययोजनेचा आराखडा तयार करण्यात आला. भूजल पातळी कमी करणे, पुरापासून उद्‌भवणारा धोका लक्षात घेऊन तिथे असलेल्या बंधाऱ्याचे चिलखतीकरण करणे, वाऱ्याने क्षार पसरू नयेत यासाठी विशिष्ट प्रकारची झाडे लावणे, अशा स्वरूपाची कामे करण्याचे योजिले गेले. आर्थिक परिस्थिती तेवढी खमकी नसल्याने जागतिक स्तरावर देणग्या देण्यात आल्या. त्यात १९९४ मध्ये प्रचंड पाऊस झाला आणि काही भिंतींना त्याचा त्रास झाला. जागतिक स्तरावर त्याविषयी चिंता व्यक्त करण्यात आली. त्याचबरोबर योजलेल्या उपाययोजनांचा थोडा फार सकारात्मक उपयोग झाल्याचेही दिसून आले. पुराचा धोकाही कायम होताच. २०१० मध्ये परत एकदा या जागेला पुराला तोंड द्यावे लागले आणि काही उपाययोजना आखण्यात आल्या.

या वेळेला मात्र कहरच झाला. गेल्या महिन्यात पुराचा तडाखा मोहेंजोदाडोला बसला. काही तासांत ७५० मिलिमीटरपेक्षा जास्त पाऊस झाला आणि मोहेंजोदाडोमध्ये पाणी घुसले. काही भिंती अंशत: पडल्या. स्तुपाचे संरक्षण करणारी भिंती कोसळली. चिखल आणि मातीचे साम्राज्य झाले. पाच हजार वर्षांपूर्वीच्या समृद्ध नगराचे लक्षणीय नुकसान झाले. लगेचच संयुक्त राष्ट्रांनी सुमारे ३.५ लक्ष अमेरिकी डॉलरची मदत पुराचा तडाखा बसलेल्या वारसास्थळांना जाहीर केली. पुढील काही महिने आता महत्त्वाचे असणार आहेत. नुकसान झालेले भाग असुरक्षित झाले आहेत. निसर्गाच्या अनेक घटकांचा परिणाम त्यांच्यावर होण्याची भीती आहे. अशा गोष्टींची वेळेत काळजी घेतली गेली नाही, तर नुकसान वाढत जाईल. याचा परिणाम पुढे जाऊन हे स्थळ धोकादायक वारसास्थळांच्या यादीत समाविष्ट होऊ शकेल.

वारसास्थळे ही महत्त्वाची आहेतच. ती इतिहासाची प्रतीके आहेत. त्यांचा ऱ्हास म्हणजे आपल्या इतिहासाचाच ऱ्हास असे म्हणता येऊ शकेल. भूतकाळाचे प्रतिनिधित्व करणारी ही वारसास्थळे आपली अस्मिता आहेत. त्यांच्याकडून शिकण्यासारखे प्रचंड असते. प्रत्येक वारसास्थळ एक गोष्ट सांगत असते आणि आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसांना प्रेरित करते. शंभर-दीडशे वर्षांपूर्वी सिंधू संस्कृती हडाप्पा मोहेंजोदाडोसारख्या वारसा स्थळांमुळे आपल्यासमोर आली. तिचा अभ्यास करता ती किती विकसित होती हेही आपल्याला समजले. वारसास्थळांचे जतन आणि संवर्धन शास्त्रोक्त पद्धतीने करायचे काम आहे. योग्य काळजी घेतली, तरच आपल्याला मिळालेला वारसा आपण सुरक्षितपणे पुढच्या पिढीला देऊ शकू.

*(लेखक वास्तू संवर्धक व भारतीय विद्या अभ्यासक आहेत.)*

# इच्छापत्र : अपरिहार्य पण दुर्लक्षित दस्तावेज

लेखांक ४

• श्रीनिवास मराठे (पृ.३९२), दादर, मुंबई भ्रमणध्वनी : ९८३३२१६४६८

**इच्छापत्र लिखाणासाठी मार्गदर्शक तत्त्वे :**
**(मसुदा कसा असावा)**

१. केवळ आंध्रप्रदेश उच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगेच नव्हे तर इच्छापत्र अवैध ठरू नये या दृष्टीने प्रत्येक इच्छापत्रात ही किंवा अशा अर्थाची तीन विधाने असणे आवश्यक आहे.
   १) 'हे इच्छापत्र करण्यापूर्वी मी कोणतेही इच्छापत्र केलेलं नाही. परंतु तसे आढळल्यास या आधीची सर्व इच्छापत्रे रद्द समजण्यात यावीत व आज मी करीत असलेले हे इच्छापत्र शेवटचे मानण्यात यावे' किंवा 'हे मी केलेले शेवटचे इच्छापत्र असून मी या पूर्वी केलेली सर्व इच्छापत्रे रद्द समजण्यात यावीत.'
   २) 'हे इच्छापत्र माझ्या मृत्युनंतर अंमलात येईल' किंवा 'माझ्या पश्चात माझ्या व्यवस्थापकांनी माझ्या इच्छेनुसार या इच्छापत्राची अंमलबजावणी करावी.'
   ३) 'हे इच्छापत्र करण्यास मी शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या सक्षम असून ते मी पूर्णपणे माझ्या स्वत:च्या इच्छेने आणि कोणाच्याही दडपणाखाली न येता केले आहे.

२. ते कर्त्याच्या स्वत:च्या हस्ताक्षरात किंवा टंकलिखित असावे.

३. इच्छापत्राच्या सत्यतेविषयी खात्री पटण्यासाठी पुढील निकष आहेत.
   १) त्यावर दिनांक असावा;
   २) त्यावर कर्त्याची स्वाक्षरी असावी.
   ३) स्वाक्षरी केलेले ठिकाण व राज्य सुस्पष्टपणे लिहिलेलं असावं आणि
   ४) किमान दोन साक्षीदारांद्वारे सत्यापित केलेलं असावं (कर्त्याने तसेच त्यांनी एकमेकांसमक्ष स्वाक्षऱ्या केल्याचे नमूद केलेलं असावं.)

४. इच्छापत्र साध्या आणि सोप्या भाषेत लिहावे आणि त्यातून कोणतेही विपरीत अर्थ निघू शकणार नाहीत किंवा प्रचलित कायद्याची कोठेही पायमल्ली किंवा उल्लंघन होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. कायदेविषयक काही शंका असल्यास किंवा केलेल्या तरतुदींमुळे वाद प्रतिवाद, कलह किंवा कोर्टकचेऱ्या होण्याची शक्यता वाटल्यास अशा अप्रिय घटना टाळण्यासाठी तरी, शक्यतो याविषयक कायद्याचे **सखोल ज्ञान** असलेल्या तज्ज्ञ वकिलांमार्फतच इच्छापत्र करावे.

५. असे इच्छापत्र मुद्रांकित कागदावर असणं किंवा Franking केलेलं असणंही आवश्यक नाही.

६. ते कोणत्याही भारतीय भाषेत लिहिलेलं असलं तरी चालेल पण त्या परिस्थितीत, प्रोबेटसाठी पिटीशन दाखल केल्यावर (आजमितीला देखील) इंग्लिशमधील भाषांतरित प्रतीची आवश्यकता असते आणि त्यात अमूल्य वेळ वाया जाऊ शकतो. यासाठी ते इंग्लिशमध्ये असणे श्रेयस्कर!

७. इच्छापत्राचे लाभार्थी आणि त्यांचे कर्त्याशी नाते यासंबंधी स्पष्ट उल्लेख असावा. प्रत्येक लाभार्थीला हक्क देण्यामागे असलेली भावना आणि लावलेल्या निकषांचाही **(विशेषत: काही नाते नसल्यास)** उल्लेख केल्यास संभाव्य वादविवाद आणि कोर्टकचेऱ्या टाळता येतील.

८. वाटप करण्यायोग्य प्रत्येक मालमत्तेचे, कोणत्याही प्रकारची संदिग्धता न ठेवता **(पूर्ण तपशील अनावश्यक पण दिल्यास उत्तम)** वर्णन केलेलं असणं आवश्यक! वाटप करतांना प्रत्येक लाभार्थीस विशिष्ट मालमत्ता किंवा शक्यतो विशिष्ट मालमत्तेचा संच (Asset class) देता येईल याची काळजी घ्यावी. - जसे सर्व मुदत ठेवी 'A' ला...' किंवा 'ABC बँकेतील सर्व मुदत ठेवी 'B' ला आणि XYZ बँकेतील सर्व मुदत ठेवी 'A' ला..' किंवा 'सर्व शेअर्स 'B' ला...' मात्र हे करतांना विशिष्ट मालमत्तेचे विभाजन करावे लागणार नाही हे पाहावे. जसे '--- या पत्त्यावरील घरातील दोन खोल्या 'C' आणि 1 खोली 'D' ला...'

९. शक्यतो बँकांतील सर्व ठेवी, DMAT खाती, सर्व बचत खाती, सर्व स्थावर मालमत्ता, अल्पबचत योजनेतील सर्व ठेवी (NSC / PPF / SCSS) किंवा टेलिफोन, मोबाईल, वीज वा गॅस कंपन्यात ठेवलेलं Deposit यासाठी नामांकन त्या त्या बँकेकडे/कंपन्यांकडे नोंदलेले नसेल तर सर्वप्रथम

ते काम करणे आवश्यक आहे. असे केल्याने कर्त्याच्या मृत्युपश्चात अशा मालमत्तेचे सुलभ आणि जलद हस्तांतरण शक्य होते. तसे नसल्यास अशा रकमा परत मिळण्यासाठी प्रोबेट/ वारसाहक्क प्रमाणपत्र, घेणे आवश्यक ठरते ज्यात वर्ष दोन वर्षांचा कालावधी लागू शकतो. वर **उल्लेख केल्याप्रमाणे नामांकन केल्याने व्यक्ती मालमत्तेची विश्वस्त होते, मालक नाही.** त्यामुळे त्या मालमत्तेची मालकी इच्छित लाभार्थीला मिळण्यासाठी त्याचे विशिष्ट **मालमत्तेविषयी नामांकन असले तरी त्या मालमत्तेच्या वाटपाविषयी स्पष्ट उल्लेख असणे अत्यावश्यक आहे.** कटुता टाळण्यासाठी, शक्य असल्यास **मालमत्तेची मालकी नामांकन असलेल्या व्यक्तिसच, पण तसा स्पष्ट उल्लेख करून** द्यावी.

१०. संयुक्त खाते असल्यास (Joint A/C) व त्यातही नामांकन असल्यास, कर्त्याच्या त्यातील हिश्श्याबाबतदेखील वरीलप्रमाणे कार्यवाही करावी लागेल. नामांकन असले तरी बँक दिलेल्या निर्देशांप्रमाणे रकमेचे प्रदान करेल. उदा. either or survivor असल्यास आणि एक खातेदार मृत झाल्यास त्याचे नाव कमी करून खाते दुसऱ्या खातेदाराच्या नावाने चालू राहू शकते. मात्र, संयुक्त खात्यांमध्ये, बँका अशा सर्वच खातेदारांच्या नांवे असलेले चेक वगैरे रकमा जमा करून घेत असल्याने खात्यातील जमा रकमेपैकी किती टक्के रकमेची मालकी कोणत्या खातेदाराकडे आहे हे ठरवणे बँकांनाच काय पण स्वत: खातेदारांना देखील वर्षाअखेरीस त्यांचा Chartered Accountant सांगेपर्यंत शक्य होत नाही. बँका अशा खात्यामधील व्याजावरील TDS सरसकट पहिल्या खातेदाराच्या 26AS (हल्ली AIS मध्ये)खात्यात आयकर खात्याच्या संकेतस्थळा upload करतात. दुसरा किंवा इतर खातेदार बँकेद्वारे केवळ प्रशासकीय सुविधेसाठी गणले जातात. त्यामुळे सर्व/काही संयुक्त खातेदारांनी आपले पैसे अशा संयुक्त खात्यात जमा केलेले असले तरी प्रत्येकाकडे त्या खात्यात जमा एकूण रकमेपैकी केवळ **त्याच्या नावे जमा** रकमेची मालकी असते. त्यामुळे एकापेक्षा जास्त खातेदारांचे पैसे अशा संयुक्त खात्यात जमा होत असल्यास इच्छापत्रात त्याविषयी स्पष्ट निर्देश असावेत. संयुक्त खात्यातील मृत खातेदाराच्या मृत्युनंतर ज्या व्यक्तींना बँकेकडून रक्कम मिळेल त्या व्यक्ती त्या रकमेपैकी मृताच्या हिश्श्याच्या विश्वस्त ठरतात. संयुक्त खात्यांविषयी या प्रावधानांची माहिती बहुतेकांना नसते. मृताच्या इतर वारसांना त्या रकमा देणे अथवा त्यांना या संयुक्त खात्यात भागीदार करून घेणे हे पर्याय असू शकतात. या कारणाने मृत व्यक्तीच्या वारसाला मृत व्यक्तीच्या वाट्याच्या रकमेसाठी अशा खातेदारावर अवलंबून राहावे लागेल. यात विनाकारण कज्जेबाजी होऊ शकते. **त्यामुळे हे टाळण्यासाठी अशा खात्यांतील रकमांच्या मालकीसंदर्भात स्पष्ट निर्देश इच्छापत्रात असणे आवश्यक आहे.**

११. इच्छापत्रात शेवटी 'Residuary Clause' असणे आवश्यक असते, ज्याद्वारे निर्देश न दिलेल्या मालमत्तेखेरीज इतर मालमत्ता अस्तित्वात असल्यास किंवा आढळून आल्यास त्यासंदर्भात स्पष्ट निर्देश असणे आवश्यक आहे. कधी कधी व्यक्ती आपल्या मालमत्तेतील काहींचा उल्लेख करायला विसरते किंवा अशा मालमत्तेच्या अस्तित्वात असण्याविषयी किंवा एखाद्या व्यक्तीकडून भेट किंवा वारसाहक्काने मिळालेल्या किंवा मिळू शकणाऱ्या मालमत्तेविषयी तिला कल्पना नसते. अशा परिस्थितीत या प्रकारचा उल्लेख असणे आवश्यक असते. जसे **'या व्यतिरिक्त माझ्या नावे काही मालमत्ता असल्यास किंवा आढळून आल्यास किंवा भेटपत्र किंवा इच्छापत्राद्वारे मला मिळाली असल्यास ती ×××× यास देण्यात यावी.'**

१२. कर्ता खूप वयस्क असल्यास त्याने आपले नेहमीचे डॉक्टर आणि/ किंवा मानसोपचार तज्ज्ञ याच्या उपस्थितीत स्वाक्षरी करणे व त्यांनी इच्छापत्राच्या अखेरीस कर्ता स्वाक्षरी करतांना मानसिकदृष्ट्या सक्षम असल्याचे आपल्या सहीने प्रमाणपत्र देऊन आपल्या नावाचा तसेच नोंदणी क्रमांकाचा शिक्का मारणे हे कायद्याने आवश्यक नसले तरी समंजसपणाचे! कारण प्रोबेट पिटीशन करतांना इच्छापत्राची सत्यता न्यायालयास पटवून देण्यात ते लाभदायक ठरते.

१३. शक्यतो इच्छापत्राच्या प्रत्येक पृष्ठावर अनुक्रमाने पृष्ठक्रमांक (१/१० किंवा 1 of 10 इ.) असावेत.

१४. प्रत्येक पृष्ठावर कर्ता व साक्षीदार यांच्या स्वाक्षऱ्या असाव्यात. यामुळे मधली पाने गहाळ होणे/ करणे किंवा अधिकची पाने घुसडली जाणे टाळता येईल. चुका असल्यास त्या दुरुस्त केल्यावर तिथे कर्ता तसेच साक्षीदार यांच्या स्वाक्षऱ्या असणे अनिवार्य आहे. इच्छापत्र किती पृष्ठांचे आहे याची नोंद कर्त्याने इच्छापत्रातच शेवटी करणे सर्वांत उत्तम.

१५. कर्त्याने आपल्या मालमत्तेप्रमाणेच आपल्या देण्यांचा उल्लेख आपल्या इच्छापत्रात करणे आवश्यक आहे. त्यांच्या परतफेडीविषयी किंवा त्याविषयी तजवीज करण्याविषयी स्पष्ट निर्देश इच्छापत्रात असणे आवश्यक आहे. मालमत्तेच्या मूल्यांकनातून याची परतफेड होणे अपेक्षित आहे. **हिंदू**

**वारसाहक्क (संशोधन) कायदा २००५ होण्यापूर्वी मृत व्यक्तींच्या सर्व कर्जाची परतफेड करणे त्याच्या वारसांवर बंधनकारक होते.** त्यास 'Pious Obligation' म्हणत. परंतु या कायद्याने हे बंधन संपुष्टात आणले. आता केवळ इच्छापत्राद्वारे किंवा वारसाहक्काने मिळालेल्या रकमेच्या मूल्यांकनाइतक्या रकमेची परतफेड करणे वारसांना बंधनकारक आहे. या कारणाने जर एखाद्या मृत व्यक्तीचे देणी त्याच्या मालमत्तेच्या मूल्यांकनापेक्षा जास्त असेल तर व्यवस्थापकाची कसोटी लागते. त्याला सर्व मालमत्ता विकून देणी भागवावी लागतात जे खूप कष्टप्रद ठरू शकते. त्यामुळे व्यवस्थापक आणि लाभार्थींनी देखील योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. पुढील लिंक पाहा.

http://www.legalserviceindia.com/articles/sons_p.htm

थोडक्यात सारांश असा : इच्छापत्राची भाषा सुबोध, साधी, सरळ आणि स्पष्ट असावी. शक्यतो प्रत्येक मालमत्ता ज्याच्या नावे नामांकन असेल त्याच व्यक्तीस द्यावी. **यामुळे नामांकन असलेल्या व्यक्तींने लाभार्थीला रक्कम देण्यास नकार दिल्यावर होऊ शकणारी कज्जेबाजी टाळता येईल.** इच्छापत्राची भाशा क्लिष्ट व कायदेशीर असल्यास लाभार्थी आपापल्या फायद्याचा अन्वयार्थ लावू शकतील हे लक्षात ठेवून इच्छापत्राचा मसुदा लिहिण्याचे काम कर्त्याने आपल्या व कुटुंबाच्या विश्वासातील वकिलावर सोपवावे. अर्थात मालमत्ता व त्यांचे लाभार्थी याबाबत निर्णय सर्वस्वी कर्त्याचा असेल.

**क्रमशः**

---

## आरोग्यं धन संपदा



१. डोळ्याभोवती काळी वर्तुळे असल्यास काकडी किसून तिचा रस गाळून घ्यावा. मऊ पातळ कपडा त्यात भिजवून हा कपडा डोळ्यांवर ठेवून, डोळे मिटून १५ मिनिटे पडून राहा. गायीच्या तुपाने डोळ्यांभोवती हलका हात फिरवावा.



२. थंडीच्या दिवसात ओठ फारच कोरडे पडतात आणि ओठ फुटतात त्यासाठी १ टीस्पून घरच्या लोण्यात, १ टीस्पून बोरॅक्स ग्लिसरिन मिसळा – चांगले एकजीव होईपर्यंत घुसळा. रोज सकाळ – संध्याकाळी हे मिश्रण लावा. विचार करताना ओठ दाबणे, ओठ चावणे टाळा.



३. नाकाभोवती, तोंडाभोवती पुटकुळ्या असल्यास त्या जाण्यासाठी चेहरा साबणाने धुवावा. टॉवेलने कोरडा करावा. अर्धा लिटर पाण्यात मूठभर कडुलिंबाची पाने टाकून उकळा. ही वाफ ५ मिनिटे घ्या. हलक्या हाताने पुटकुळ्या फोडा व लगेच बर्फ फिरवा.

४. हिवाळ्यात हात-पाय थंडीमुळे फुटतात तेव्हा हातपाय मऊ पडण्यासाठी अंड्याचे पांढरे बलक १ टीस्पून मध व १ टे. स्पून, ग्लिसरीन एकत्र करून चांगले घुसळा. १ तास लावून ठेवा. नंतर चोळून धुवून टाका.

## मराठी दिन





मराठी आमुची जणू सौदर्याची खाण
अनेक रूप, अनेक रंग; समृद्धीची बहार

वेशीनुसार बदले रंग; ओळख बने त्या गावाची
शब्दांचे भांडार जणू; उधळी मुक्त हस्तांनी

वाटे अवघड; परी भासे गोड
कधी बने कट्यार; कधी मुलामा थोर

## पहाट



काळोखाच्या आडून
हळूच पहाट आली
किरणांवर स्वार होत
ऊठा ऊठा म्हणाली
थंडाव्याच्या लालीत
वसुंधरा ही न्हाली
पक्षांच्या कुजनात
अवनी सारी रंगली

– **संध्या खांबेटे** (पृ. ६९६) ठाणे
भ्रमणध्वनी : ९८६७०७२२४६

# आयुष्यावर लिहू काही...

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०), वडाळा दूरध्वनी – ९८२०२३२०८२

सुख किंवा दुःख येणे आपल्या हातात नसते. परंतु सुखी किंवा दुःखी न होणे आपल्या हातात असते.

"जगी सर्व सुखी असा कोण आहे?
विचारी मना तूचि शोधूनि पाहे।"

असे समर्थ रामदास स्वामींनी 'मनाच्या श्लोका'द्वारे लोकांना सांगितले आहे. खरेच जगात सर्व सुखी असलेला मनुष्य शोधूनही सापडत नाही.




हे सत्य लक्षात घेऊन, माणसाने आपल्याला कोणती सुखे मिळाली नाहीत याचा विचार करून दुःख करण्यापेक्षा, आयुष्यात जी काही सुखाची, जमेची बाजू असेल तिचा विचार करून समाधानाने जगावे असा उपदेश समर्थांनी केला आहे.

परंतु प्रत्यक्षात प्रत्येक मनुष्य कळत-नकळत मिळत असलेल्या सुखाकडे दुर्लक्ष करून, जे सुख मिळाले नाही त्याबद्दलच दुःख करीत बसतो.

बहुतेक जण सदैव आपल्या अप्राप्य सुखाच्या दुःखात बुडालेलेच दिसतात... परंतु यालाही काही मंडळी अपवाद असतात. अशाच व्यक्तीपैंकी 'आयुष्य हेऽऽऽ' पुस्तक लिहीणाऱ्या लेखिका सौ. माधवी आपटे आहेत.

त्यांच्याही आयुष्यात त्यांना कटू अनुभव आले. कसोटीचे, संघर्षाचे प्रसंग आले. कुटुंबात आणि बाहेर सार्वजनिक जीवनात चांगले वागूनही वाईटपणा पदरात आला. मानहानीचे प्रसंगही आले. पण या सर्व कठीण प्रसंगांना त्या धीराने सामोरी गेल्या. रोजचे जीवन कसे आनंदी राहील या वाईट-कटू अनुभवांचे सावट कुटुंबावर न पडता, नको असलेल्या आठवणी, अप्रिय प्रसंग कुरवाळत न बसता आपल्यामुळे इतरांच्या जीवनात आनंद कसा फुलवता येईल असा सकारात्मक हेतू ठेवून वागत राहिल्या.

लेखिका माधवी आपटे या नात्याने माझ्या 'प्रेमळ' सासूबाई आहेत. सासूबाई आणि 'प्रेमळ'? थोडे खटकते ना? पण त्या माझ्या सख्ख्या नाहीत तर 'मावस' सासूबाई आहेत म्हणून हा खुलासा.

माझे लग्न झाल्यापासून गेली ४० वर्षे मी त्यांना जवळून पाहाते आहे. त्या आमच्या 'माहेरवाशिण' आहेत आणि माहेरवाशिणीला यथोचित 'मान' देण्यात आम्हाला आनंद वाटतो. या पुस्तकात त्याविषयी, ताई-दादांविषयी त्यांनी प्रेमाने भरभरून लिहिले आहे. तो सर्व भाग वाचनीय आहे.

**ज्ञानगंगा**

जगातील कोणत्याही देशाची ओळख ही त्या देशाची शिक्षणव्यवस्था असते. एकूणच समाजरचनेत शिक्षणाचे महत्त्व जगाच्या पाठीवर कोणीही नाकारू शकत नाही. शिक्षणव्यवस्था ही समाज व्यवस्थेचा कणा असते आणि अशा अनुभव, ज्ञान, कौशल्य, अध्यापन क्षमता असलेली लेखिका शिक्षिका आहे. नव्हे नव्हे तर भूतपूर्व प्राचार्य आहे. त्यामुळे पुस्तकातील अनेक लेखांमधून साक्षात ज्ञानगंगा वाहाते आहे.

**उत्तम संकलन**

या पुस्तकात एकूण ७४ लेख आहेत. अनुक्रमणिकेवरून नुसती नजर टाकली तर लक्षात येते. किती विविध प्रकारच्या विषयांवर लेख लिहिले आहेत... लेखिका गणित-विज्ञानात पारंगत, तिचा पर्यावरणाचा अभ्यासही उल्लेखनीय आहे. पुस्तकातील काही लेख 'ब्रह्मवार्ता', तर काही भारतीय शिक्षण समाजाच्या मासिकात, काही ज्येष्ठ नागरिकांच्या मासिकात, तर काही ज्योती हस्तलिखितात, काही निबंध स्पर्धेत पारितोषिक प्राप्त ठरलेले आहेत. श्रध्दानंद महिलाश्रमाच्या स्मरणिकेमध्ये लेख आहेत. असे निरनिराळ्या अनेक ठिकाणी प्रसिध्द झालेले लेख एकत्र करून 'आयुष्य हे ऽऽऽ' पुस्तक आकाराला आले आहे. लेखांचे संकलन उत्तररित्या केले आहे. मोती जसा एकेकटा पाहिला तरी टपोरा, तेजस्वी दिसतो. पण त्या मोत्यांचा गुंफून एकत्र हार केल्यावर त्याचे सौंदर्य आगळेच. तसेत या पुस्तकातील एकत्रित केलेल्या, संकलित केलेल्या लेखांबद्दल म्हणता येईल.

'आयुष्य हे ऽऽऽ' पुस्तक वाचताना अनेक प्रश्न मनात आले. लेखिकेला लिहावेसे का वाटले? 'स्वान्त सुखाय' साठी लेखिकेनी लिहिते आहे का? हे आत्मचरित्र आहे का? यात स्वकर्तृत्त्वाची प्रतिमा जपण्याचा प्रयत्न लेखिका करते आहे का? तर उत्तर नाही असे येईल.

**भाषाशैली**

लेखिकेची भाषा प्रवाही आहे. कधी तिला लालित्याचा सुरेख स्पर्श होतो तर कधी ती अगदी घरगुती रोखठोकपणा दाखवते. त्यामुळे रूक्ष, कंटाळवाणे लेख होत नाहीत. लेखिकेचे संवेदनशील मन, हळूवार भावना, सामाजिक जाणिवा आणि राष्ट्रीय भावना किती प्रबळ आहेत याचे दर्शन लेख वाचताना होते. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना हे पुस्तक प्रकाशित होत आहे. चांगला योगायोग म्हणावा लागेल. कारण लेखिकेचा जन्म १६ सप्टेंबर १९४७चा. तिची मोठी बहीण ताई देशभक्त, 'राष्ट्र सेविका दल' समितीची हाडाची कार्यकर्ती. तिचे 'विजया' नाव ठेवले होते. माहेरची विजया वामन जोशी. हे सर्व वाचले की जाणवते हा दुग्धशर्करा योग पुस्तक प्रकाशनासाठी जुळून आला आहे! लेखिकेच्या जन्माआधी एकच महिना, १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. ही सर्व पार्श्वभूमी त्यामागे आहे.

**पतीचा सिंहाचा वाटा**

यशस्वी पुरूषाच्या मागे एक स्त्री असते असे म्हणणारे कित्येक असतील नव्हे आहेत. पण आमचे यश आमच्या घरातील स्त्रीनेच उभे केले आणि हे सर्व तिचेच! असे अभिमानाने सांगणारे आपटे कुटुंबातील लेखिकेचे पती श्री. सदानंदराव आपटे हेच आहेत. त्यादृष्टीनेही लेखिका भाग्यवान आहे.

तात्पर्य किंवा सारांश असा की, 'आयुष्य हे ऽऽऽ', हे पुस्तक लिहून लेखिकेने तिला मिळालेले आनंदाचे क्षण भरभरून ओंजळीत टाकले आहेत. ते आपण 'दुबळी माझी झोळी' असे न म्हणता जास्तीत जास्त वेचले पाहिजेत. जेणेकरून आपले आयुष्यही आनंदी, समाधानी होईल अशी आशा करायला हरकत नाही. एवढे या पुस्तकाचे यश आहे. लेखिका अभिनंदनीय, धन्यवादाला पात्र आहे. मी लहान आहे तेव्हा मनोभावे नमस्कार करून 'मावशी' तुमचा कृपाप्रसाद असाच आमच्या परिवारावर राहो. तुमची भरभरून माया आणि प्रेम तुमच्या लाडक्या भाच्याला, मोहनला मिळावे ही परमेश्वर चरणी प्रार्थना आणि तुम्हाला निरामय आरोग्य मिळो. त्यामुळे तुमची लेखणी पाझरत राहिल या सदिच्छा. ♦

---

# आर्थिक वर्ष २०२१-२२ या वर्षाच्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

'मराठे प्रतिष्ठान'ची ४०वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ६ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी ठीक १० वाजता स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक दादर मुंबई येथे संपन्न झाली. सभेला उपस्थिती समाधानकारक नव्हती. या सभेमध्ये नेहमीचे महत्त्वाचे विषय उदा. मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे, शोकप्रस्ताव, अहवाल व ताळेबंद मंजुरी, अंदाजपत्रक, लेखापरीक्षक नियुक्ती इ. विषय घेतले गेले. याशिवाय यावर्षी विश्वस्त मंडळाची व कार्यकारी मंडळाची मुदत संपली असल्याने निवडणूक जाहीर झाली होती. आलेल्या आवेदनानुसार विश्वस्त व कार्यकारी मंडळाची स्थापना केली गेली.

दि ०६/११/२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत खालील विश्वस्त मंडळ व कार्यकारी मंडळ सदस्यांची निवड झाली.

विश्वस्त निवड सहा वर्षे व कार्यकारी मंडळाची निवड तीन वर्षांसाठी असेल.

**विश्वस्त मंडळ**

१) आनंदराव मराठे
२) सुलभाताई मराठे
३) दत्तात्रय मराठे
४) विजय मराठे कार्यकारी मंडळाकडून

**कार्यकारी मंडळ**

१) विजय मराठे (कार्याध्यक्ष)
२) शैलेंद्र मराठे (कार्योपाध्यक्ष)
३) हेमंत मराठे (कार्यवाह)
४) अशोक मराठे (सहकार्यवाह)
५) अनंत मराठे (कोषाध्यक्ष)
६) श्रीनिवास मराठे सदस्य
७) प्रदीप मराठे सदस्य गोवा प्रतिनिधी
८) राहुल विद्वांस सदस्य
९) सौ. सुमेधा मराठे सदस्य
१०) सौरभ मराठे सदस्य पुणे प्रतिनिधी
११) प्रमोद मराठे सदस्य अमरावती प्रतिनिधी.

या सभेनंतर मराठे डिजिटल कुलवृत्तांता साठी बनवल्या जाणाऱ्या संगणक प्रणालीचे प्रात्यक्षिक (ऊशो) दाखवले गेले. जुन्या १९९२ च्या छापील कुलवृत्तांतातील माहिती या प्रणालीत अद्ययावत केल्यावर, गुढीपाडव्याच्या सुमुहूर्तावर कुलवृत्तांत आपल्या वेबसाईटवर कार्यरत होईल अशी आशा आहे.

**– हेमंत मराठे** (पृ. २१), नालासोपारा
कार्यवाह मराठे प्रतिष्ठान

# समाजातील हरवत चाललेले संस्कार

• सौ. सोनाली राहुल विद्वांस (पृ.६४९), कल्याण — दूरध्वनी : ९५९४०३८४३७

काल मुलाच्या शाळेत पालक सभेसाठी गेले होते. मिटिंग चालू होण्यासाठी वेळ होता. दोन छोट्या मुलांमधील संवाद सहजच कानावरती पडला. एक दुसऱ्याला सांगत होता, ''माझं ऐकलं नाहीस ना, तर गोळी घालीन मी.'' हे ऐकल्यावर चक्रावले मी जरा! ह्या प्रसंगाने मला अंतर्मुख केलं कारण ती मुलं जेमतेम तीन नाहीतर चार वर्षांची असतील, माझ्या मनात विचार आला हे असे संवाद माझ्या मुलाच्या कानावर पडतील तर तो ही असा बोलेल का? खरंतर हे जे काही तो मुलगा दुसऱ्याला बोलला ते त्याचं कळायचं वयंही नव्हे. मी नंतर शाळेच्या मॅडमकडे याबाबत बोलले त्यांना पण खूप धक्का बसला. याबाबत आम्ही म्हणजे शाळेचं व्यवस्थापन योग्य अंमलबजावणी आणि पालकांचं समुपदेशन करेल असं त्यांनी मला आश्वासन दिलं.

ह्या प्रकाराने माझ्यातील आईच्या डोळ्यांत अंजन घातलं. जेव्हा आमच्यासारखे पालक अॅडमिशन घेतात तेव्हा तर अनेक माध्यमांमधून आम्हाला मनावर बिंबवलं जातं की सर्वांगीण विकास करतो म्हणून! खूप विचार केल्यानंतर मला लक्षात आलं की, सर्व घरांमध्ये टिव्ही बघणे आणि मुलांना सतत कार्टुन बघायला लावणे ह्याचा तो परिणाम असावा.

लॉकडाऊन मुळे मुलं खेळ खेळायला विसरली आहेत. सतत आपलं मोबाईलवर गेम नाहीतर कार्टुन! त्यांच्या बालपणामध्ये मैदानी खेळ, गोष्टी, गाणी, श्लोक असतात हे संस्कार आपणच त्यांना शिकवायचे असतात. मी घरातील ज्येष्ठ व्यक्तींवर टीका करते, असं नाही. पण कळकळीने सांगते की, ज्येष्ठ व्यक्ती पण सतत सिरिअल्स नाही तर मुव्ही बघण्यामध्ये व्यस्त असतात. मुलं तर अनुकरणप्रियच असतात. त्यांचं ते अनुसरण अगदी नैसर्गिक आणि स्वाभाविक आहे.

खूप घरं मी अशी बघितली आहेत की तिथे संवादच नाही. प्रत्येकजण जेवणाच्या ताटावर असताना पण व्हॉटस्‌ॲप नाहीतर फेसबुकवर! घरातील चार माणसांशी आपल्याला जमवून समजून घेता येत नाही आणि सोशल मिडियावर एकदम अॅक्टीव्ह!

मुलांसाठीचे जे कार्टुन बनवले जातात त्यामध्ये पण भाषा सभ्य वापरायला हवी अशी सक्ती करायला हवी. ही भाषा जर सभ्य असेल तर चांगले शब्द मुलांच्या कानावर पडतील.

खरंतर माझी सर्व घरातील ज्येष्ठ व्यक्तींना विनंती आहे की, त्यांनी सतत सिरिअल्स बघण्यात व्यस्त राहू नये. छोट्या मुलांचे आईवडील तुमच्यावर भरवसा ठेवून बारा, तेरा तास घराबाहेर जातात. कारण माझ्या मुलाला चांगलं शिकवायचं आहे. मला मान्य आहे की त्यांच्या उतारवयात त्यांना मनासारखं जगायचं असतं पण लहान मुलांच्या बालपणातील पाच वर्ष जर आपण त्याग करू शकलो ना तर मुलं पण सतत टीव्ही बघायचा आणि त्याऐवजी आपण लहान मुलांशी संवाद साधला, गोष्टी सांगितल्या, श्लोक शिकवले तर कधीही न संपणारं ज्ञान ते ग्रहण करतील. त्यांना नवीन गोष्टी शिकण्याची आवड निर्माण होईल आणि संस्काराची शिदोरी त्यांना आयुष्यभर साथ देईल. जग विज्ञानामुळे खूप पुढे गेलं पण सगळीकडे नुसता पैशाचा झगमगाट! कुठलाही प्रसंग/शुभकार्य असो तिथे आनंद नाही, समाधान नाही, प्रेमाचे, आपुलकीचे दोन शब्दही नाहीत. मुलंही हे आजुबाजूचे वातावरण बघतात आणि त्यांना पण सवय होते ना आभासी आणि झगमगाटाची, चकचकीत दुनियेची!

## हसरे हितगुज

**नातेवाईक** : तुमच्या मुलाचे लग्न डिजिटल होणार म्हणजे कसं?
**वराचे वडील** : गिफ्ट देताच तुम्हाला ओटीपी येणार. तो जेवणाच्या काऊंटरवर दाखवायचा आणि पंगतीत बसायचेय.

**रुग्ण** : डॉक्टर, काही दिवसांपासून उजवा गुडघा खूप दुखतोय.
**डॉक्टर** : अहो, वयानुसार असं होणारच...
**रुग्ण** : माझा डावा गुडघाही त्याच वयाचा आहे...!

## सुविचार

दत्तमय जग निर्गुण निरंकार। नाही भेदभाव अंतरीच।।
काया वाचा मन दत्तरुप। तूची आधार जगतात ।।
भिन्न स्वरुप भिन्न अवतार। परी एक नाम तारक ।।
अवधूत दिगंबर नाम एक तारी। जगी या उद्धारी सर्वश्रुत।।

– **संध्या खांबेटे** (पृ.६९६) ठाणे
भ्रमणध्वनी : ९८६७०७२२४६

भावपूर्ण श्रद्धांजली!

# (कै.) श्री. सी. गो. खांबेटे

मला मराठे प्रतिष्ठानला जोडले श्री. वा. ग. मराठे ह्यांनी. ते दिल्लीच्या बृहन्महाराष्ट्र मंडळाचे कार्यवाह (कै.) रमेश मुळगुंद ह्यांचेशी निगडीत होते. मी दिल्लीत सेवेत असताना मुख्यमंत्री मा. वसंतदादा बृहन् महाराष्ट्र मंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष असताना त्यांच्या कार्यकारिणीवर मला घेतले. तेथे माझा वा. ग.शी संबंध आला. त्यांनी मला मराठे प्रतिष्ठानवर मराठे तितुके मेळवावे ह्या ध्येयाने प्रेरित होऊन मला मेळविले व माझा मराठे प्रतिष्ठानशी संबंध आला व तेथे माझा खांबेटेंशी संबंध आला. दुसरा दुवा त्यांचे व माझे खारचे समान परिचित जनसंघ कार्यकर्ते व महाराष्ट्र विधान परिषद सदस्य (एमएलसी) श्री मधुकरराव देवळेकर हा होता.

श्री खांबेटे बँक ऑफ इंडियाच्या सेवेत असताना बँक कामाचे संगणिकीकरण करण्याच्या कामात त्यांचा सिंहाचा वाटा होता व हे आधुनिक तंत्र त्यांनी मराठे प्रतिष्ठानच्या कामात वापरले. त्यांनी व श्री श्रीनिवास मराठे (दादर) ह्यांनी ह्या कामात मोठे योगदान दिले आहे.

संघ स्वयंसेवक असलेले श्री. खांबेटे ह्यांनी मराठे प्रतिष्ठानच नव्हे तर इतर चित्पावनांच्या कुलवृत्तांताच्याही कामात स्वत:ला वाहून घेतले व झपाटल्याप्रमाणे काम केले. अंधेरीच्या त्यांच्या बँक सोसायटीच्या चवथ्या - पाचव्या मजल्यावरील फ्लॅटचे जिने चढणे, उतरणे. अंधेरी (पूर्व) रेल्वे स्टेशनचे नंतर दादर स्टेशनचे प्रभादेवी - जिने चढणे, उतरणे असे खांबेटेंचे आयुष्य चढउताराचे होते. त्यांचा उत्साह स्तिमीत करणारा होता व त्यांना मी कधी चिडलेले, रागावलेले पाहिले नाही.

वैयक्तिकरीत्या त्यांनी मला आमच्या कळंबुशी (क्र. ४६) घराण्यातील बार्शी (सोलापूर) ला गेलेल्या कुटुंबियांचा इतिहास (आम्ही बार्शीकर मराठे) लिहिण्यास नुसते प्रोत्साहितच केले नाही तर त्याचे स्वत: डिटीपी करून ते झेरॉक्स छपाई पुस्तक करून दिले. त्याचे प्रकाशन मी बार्शीला आमच्या शेतातील हुरडा पार्टीत त्यांचेच हस्ते केले. त्यांचे त्यातील 'स्वगत' आम्ही बार्शीकर मराठेंना सतत प्रेरणा देते.

खांबेटे वा. ग. व मी प्रतिष्ठानसाठी बंगलोर, कारकल, उडपी - दक्षिण कर्नाटक ठिकाणी एकत्र गेलो. प्रतिष्ठानचा कुलवृत्तांत डिजीटल करण्याचे काम पुरे करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल! त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच प्रर्थना!

**- मोहन सदाशिव मराठे** (पृ. ३६५) खार, मुंबई
भ्रमणध्वनी : ९८१९९६४७६५

---

सी. गो. खांबेटे यांचे दु:खद निधन झाल्याची बातमी समजली आणि खूप वाईट वाटले. भूतकाळातील आठवणी मनात दाटून आल्या. मी म. प्र. च्या कामाला सुरुवात केली तेव्हा सी. गो. कोषाध्यक्ष होते. त्यामुळे नेहमीच त्यांचे मार्गदर्शन मिळत असल्यामुळे आमचे काम सुलभ झाले.

सी. गो. नी वेगवेगळ्या ठिकाणच्या कपी गोत्री मंडळींशी चिकाटीने संपर्क साधून त्यांनी म.प्र.चे अनेक सभासद वाढवले. कुलवृत्तांतातील माहिती अद्ययावत करण्यासाठी त्यांनी संगणकाद्वारे बरेच प्रयत्न केले. संगणकाशी त्यांची विशेष मैत्री असल्याने म. प्र. च्या सभासदांची विभागवार सूची बनवून हितगुजच्या माध्यमातून क्रमश: प्रसिद्ध केली होती. एवढेच नाही तर साईबाबांच्या जन्माची कहाणी या पुस्तकाचे संपूर्ण डिटीपी त्यांनी उत्कृष्टपणे पूर्ण केले होते.

सी.गों. नी हितगुजच्या काही अंकाचे संपादन व काही अंकाचे सहसंपादक म्हणूनही काम पाहिले होते. म.प्र.च्या संकेतस्थळावर हितगुजचे अनेक अंक सर्व वाचकांसाठी उपलब्ध करून दिले होते.

म. प्र. च्या मिटिंगमध्ये एखादी नवीन योजना मांडली गेली तर सी. गों. चा नेहमी त्यात सक्रिय सहभाग असे. त्यांना कामाची खूप आवड होती. त्यामुळे ते अनेक कामांची जबाबदारी स्वत:हून स्वीकारत असत. परंतु शारीरिक मर्यादा, वय व मुंबईतील दूरदूरची अंतरे यामुळे दिलेल्या वेळेत ते काही कामे पूर्ण करू शकत नसत. त्यामुळे काही वेळेला वादाच्या प्रसंगांनाही त्यांना सामोरे जावे लागे.

सी. गों.च्या बाबतीत एक व्यक्तिगत अनुभव मला आवर्जून सांगावासा वाटतो. ८-१० वर्षांपूर्वी माझ्या बहिणीच्या नातीची १२ वी नंतरची प्रवेश परीक्षा होती. तिचा नंबर अंधेरीला आला होता. आमचे मुंबईत कोणीच नातेवाईक नव्हते. त्यामुळे फोनवर सी. गों. शी संपर्क साधला. एक रात्र माझे मिस्टर नातीला घेऊन त्यांच्याकडे राहिले होते. तेव्हा त्यांनी खूपच चांगले आदरातिथ्य केले व परीक्षा स्थळापर्यंत जाण्यासाठी व्यवस्थित मार्गदर्शनही केले होते, ते आम्ही कधीच विसरू शकणार नाही.

सी. गों. नी म. प्र. मध्ये प्रारंभी कार्यकर्ता, नंतर कोषाध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विश्वस्त अशी अनेक पदे त्यांनी भूषविली. असे हे सर्वगुणसंपन्न, सतत कार्यरत राहणारे, प्रवासाची व माणसांची विशेष आवड असणारे, संगणकावर विशेष प्रेम करणारे सी. गो. आज आपल्यात नाहीत. त्यांच्या आत्म्याला सद्‌गती मिळावी, हीच परमेश्वर चरणी प्रार्थना!

– **सौ. नीलांबरी रमेश मराठे** (पृ.२८०), पुणे
भ्रमणध्वनी : ९४०४२४१७६१

# कल्पवृक्ष कन्येसाठी लावूनिया बाबा गेला

नमस्कार,

माझे बाबा, श्री. सीताराम गोपाळ खांबेटे, यांना सोमवार दिनांक २९/८/२२ रोजी पहाटे अल्पशा आजाराने 'देवाज्ञा' झाली.

तर माझे बाबा अस्सल शंभर नंबरी खणखणीत व्यक्तिमत्व, शब्दांचे पक्के, निर्णयक्षमता असलेले, निर्व्यसनी, निस्वार्थी आणि निरामय जीवन जगणारे. वयाच्या एक्क्यांशी वर्षांपर्यंत आरोग्याची धनसंपदा जपणारे, ज्ञान म्हणजे मेंदूचं खाद्य समजणारे, उतार वयाच्या टप्प्यावरही पाणिनी व्याकरण शिकण्यासाठी आसुसलेले, अनेक पुस्तकांच्या संपादनाला, भाषांतराला तसेच डॉक्युमेंटेशनला निःशुल्क हातभार लावणारे, निवृत्त लोकांसाठी त्यांना हवी तशीच मदत करणारे, 'मराठे प्रतिष्ठान'च्या कार्यासाठी स्वत:ला वाहून घेणारे, कुलवृत्तान्तांच्या कामाला दिवस रात्र एक करणारे तसेच 'बँक ऑफ इंडिया रिटायर्ड ऑफिसर्स असोसिएशन'चे ॲक्टिव्ह मेंबर ही होते. लोकांचं भरपूर प्रेम आणि मान हीच खरी मालमत्ता होती त्यांच्यासाठी. आज ते या जगात शरीराने नसले तरी त्यांच्या कामाने कायम आठवणीत रहातील. विशेष म्हणजे मी त्यांची लाडकी मुलगी असल्याचा मला अभिमान आहे. ते नेहमी मला म्हणायचे कायम कोणतीही अपेक्षा न ठेवता सत्कार्य करत रहायचं. त्यांच्या आयुष्यात त्यांनी सचोटीने शून्यातून सुरुवात केली होती. बाल वयात असल्यापासून खूप खस्ता खाव्या लागल्या. पण आला दिवस पान पलटल्यासारखा पालटून ते झपाट्याने प्रगती करत गेले. सगळ्या ठिकाणी उंचीच गाठायची हे त्यांचं ध्येय होतं. बँक ऑफ इंडियाचे कम्प्युटर इनचार्ज आणि झोनल मॅनेजर या पदावर असताना रिटायर झाले होते. भरपूर मान मिळाला होता. असे शेवटपर्यंत तल्लख बुद्धीचे असणारे माझे बाबा जगाचा निरोप घेतानाही ताठ मानेने सुखासुखी गेले. त्यांना सद्गती मिळली असेलच, असा विश्वास बाळगून जड अंत:करणाने मी माझे मनोगत थांबवते.

– **सौ.शिल्पा गोखले (खांबेटे)**,पृ. ६२३

## सहवेदना

मी बडोद्याचा मोहन मराठे आपल्यापेक्षा लहान असलेल्यालांना श्रद्धांजली वाहताना कचरतोय. तरीही एक व्यवहार म्हणून धाडस करावेच लागते आहे. बडोद्यातील १९४९ सालापासून अस्तित्वात असलेली श्री समर्थ सेवा संघ ही संस्था श्री दासनवमी उत्सव सातत्याने ऊजवते आहे. नामांकित किर्तनकार प्रवचनकार यांनी आपली सेवा दिली आहे. १९९२ साली डॉ. रामचंद्र देखणे



हे प्रसिद्ध व्यक्तिमत्व नव्हते व म. टाइम्स मधील वेधक वृत्तात आलेली माहीती वाचून संस्थेचा नियम मोडून त्यांना आमंत्रित करून भारूड गोंधळ किर्तन वासुदेव दिंडी असे चार दिवस कार्यक्रम ठेऊन किर्तन प्रवचनाव्यतिरिक्त कार्यक्रम देऊन बडोदेकरांची मने ज्यांनी जिंकली ते आमचे माऊली डॉ रामचंद्र देखणे ह्यांना २६ सप्टेंबर ला देवाज्ञा झाली हे २७ ता.ला कळल्यावर हा इतिहास आठवला. आज शोकसभा आहे असे भावार्थ कडून कळले व मी किंवा आमचे इतर कार्यकर्ते पुण्यात येऊ शकत नसल्यामुळे हे शोकस्तवन म्हणा श्रद्धांजली म्हणा किंवा दु:खाश्रु म्हणा हे वाहतोय मी! पण देखणे कुटुंबीय सदस्य असल्यामुळे हे दु:ख वाटून घेऊन वहिनी व मुले नातवंडांचे दु:ख कमी करण्याचा प्रयत्न करतोय. त्यांना मृत्यु चांगला आला पण आपल्या सर्वांना दु:ख देऊन गेला. आता भावार्थ ही तयार झाला आहे व त्यांचे कार्य तो त्यांच्या हजेरीतच पुढे न्यायला सुरुवात केली असताना डॉक्टरांनीच पसंतीची पावती दिली होतीच व त्याची आई, धर्मपत्नि, बहिण, आत्या त्याला एकूणच साथ देत आहे. गुढीपाडव्याला दरवर्षी डॉ.चे पोस्टकार्ड ज्ञानेश्वरीतील एक ओवी लिहीलेले येतच होते ते आता बंद झाले. असो ईश्वरइच्छा बलियसी. डॉ.च्या आत्म्यास सदगति लाभणारच आहे तरी त्यांच्या स्मृतीस मी वैयक्तिक व बडोदेकरांकडून वंदन करून माझे दोन शब्द पुरे करतो. जय श्रीराम.

– **मोहनकाका मराठे** (पृ. ४२१),
श्री समर्थ सेवा संघ,
बडोदे.

माझा व रामचंद्र देखणे यांचा संबंध १९९२ सालापासून आहे. पुणे जवळील निगडी प्राधिकरण येथे पीआरओ म्हणून नोकरीत होते व रीटायर्ड झाले ते डेप्युटी कलेक्टर म्हणून, हे व्यक्तिमत्व पहिल्यापासून साधे व अत्यंत गरीब स्थितीत होते. अप्पा बळवंत चौकात नातू वाड्यात राहणारे कुटुंब व तेव्हापासून माझे त्यांचेकडे जाणे येणे आहे व डी एस कुलकर्णींनी नातूवाडा डेव्हलप केल्यावर दुसऱ्या मजल्यावरील टेरेसचा फ्लॅट फक्त ह्यांनाच दिला आहे. त्यात त्यांचे कार्यक्रम होतात. दरएक भेटीत काहीतरी भेट वस्तु देऊन सन्मान करायचे. ह्यावर्षी मार्च महिन्यात त्यांच्या आईवडीलांचे पुण्यतिथी निमित्त कार्यक्रमात सुबोध भावे यांच्या वडीलांच्या हस्ते शाल पांघरून माझा सत्कार केला. १९९२ साली बडोद्यात आले असतानां त्यांचा बडोद्यातील विविध संस्थाकडून सत्कार करतानां १० ते १५ हार त्यांच्या गळ्यात पडले व त्यांच्या आई माझे शेजारी बसल्या होत्या व त्यांचे डोळ्यात पाणी आलेले पाहून मी त्या माऊलीला विचारले का डोळ्यात पाणी आले त्या म्हणाल्या ह्या रामचंद्राची मुंज आमची गरीबी होती म्हणून देवीच्या मंदीरात लावली व देवीच्या गळ्यातला हार तेव्हां त्याला घातला होता व आज हे पंधरा हार पाहून मला गहीवरून आले. असे हे देखणे सरकारी नोकरीत राहूनही स्वच्छ राहीले. राजकारणी नेते त्यांची भाषणे ह्यांच्याकडून लिहून घ्यायचे. ते विद्यावाचस्पति होते. अशा ह्या माणसाविषयी किती लिहू तरी कमी पडेल असो त्यांच्या कुटुंबावर मोठा आघात झाला आहे तो कधीच भरून येणार नाही.

**– मोहन मराठे,** बडोदे

# श्री. सीताराम गोपाळ खांबेटे

प्रतिष्ठानच्या स्थापनेला एक तप लोटल्यानंतर प्रतिष्ठानचे सध्याचे उपाध्यक्ष सीताराम गोपाळ खांबेटे, ज्यांना बहुतेक जण 'सी.गो.' म्हणून ओळखतात, यांचं प्रतिष्ठानमध्ये पदार्पण झालं. 'बँक ऑफ इंडिया'मधील प्रबंधकाच्या पदावरून निवृत्त झालेल्या सी. गो. नी प्रतिष्ठानच्या कामात रस घेण्यास सुरुवात केली १९९३/१९९४ साली. विविध ठिकाणच्या मराठे मंडळींशी संपर्क प्रस्थापित करून त्यांनी जणू सभासदत्व अभियानच सुरू केलं. कुलवृत्तांतात विशेष रूची असल्यानं कर्नाटक प्रांतात संचार करून तेथील मराठे मंडळींशी संपर्क वाढवून बऱ्याच नव्या सभासदांची नोंदणी केली. बँकेत असतांना संगणकाशी विशेष मैत्री असलेल्या सी. गों. नी प्रतिष्ठानच्या सभासदांची संपर्क क्रमांकासह विभागवार सूची बनवून हितगुजच्या माध्यमातून २००५ साली क्रमशः प्रसिद्ध केली होती. ही सूची बनविताना अनेक सभासदांशी थेट संपर्क केल्याने जवळ जवळ ४००-५०० सभासदांना ते वैयक्तिकरित्या ओळखत. १९९२ साली प्रसिद्ध झालेल्या कुलवृत्तांतातील माहिती अद्ययावत करण्यासाठी पुढाकार घेऊन संकेतस्थळ व हितगुजमार्फत आवाहन करून माहिती मिळविली व कुलवृत्तांत, त्यातील सुधारणा व नवीन माहितीसह PDF स्वरुपात बनवला.

पुण्याचे संगणकप्रेमी श्री. माधव मराठे यांनी प्रतिष्ठानसंबंधित माहितीचे संकलन करून प्रयत्नपूर्वक प्रतिष्ठानचे संकेतस्थळ सुरू केले होते. आलेल्या काही अडचणी दूर करून खांबेटे यांनी ते संकेतस्थळ अधिक उपयुक्त बनवले व 'हितगुज'चे ६८ (डिसेंबर २००६) ते ८२ (जून २०१०) हे अंक वेळोवेळी संकेतस्थळावर उपलब्ध केले. मात्र जागेच्या अभावी यापुढील अंक संकेतस्थळावर उपलब्ध होऊ शकले नाहीत.

१९९८ ते २००४ या कालावधीत प्रतिष्ठानच्या कोषाध्यक्ष पदाची धुरा सांभाळली. लक्ष्मणरावांच्या नंतर सध्याच्या संपादिका डॉ. सौ. सुमेधाताई यांनी हितगुजची धुरा हाती घेईपर्यंत हितगुजच्या दोन अंकांचं संपादकत्व भूषवून मग काही अंक सहसंपादक या नात्यानंही काम केलं. २०१३ पासून आजतागायत ते उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. प्रतिष्ठानच्या वाटचालीतच नव्हे तर वृद्धीतही मोलाचा वाटा आहे. 'सि.गों.'चा व त्यामुळेच नव्या दमाच्या कार्यकत्यांसाठी एक आधारस्तंभ आणि मार्गदर्शकाची भूमिका सध्या ते बजावत आहेत.

*(मैत्र स्मरणिका सांगली संमेलन २०१६)*

## सहवेदना

### श्री. मधुसूदन तथा आप्पा खांबेटे यांचे निधन
(पृ. क्र. ६९६)

शुक्रवार दि. १८ नोव्हेंबर या दिवशी आपले ज्येष्ठ कुलबांधव श्री. आप्पा खांबेटे, ठाणे (पृ. क्र. ६९६) यांचे राहात्या घरी दुःखद निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात त्यांचे चिरंजीव श्री. गिरीश, स्नुषा सौ. गीता, हर्षवर्धन व नंदन ही नातवंडे असा परिवार आहे.

मराठे प्रतिष्ठानच्या कार्यात आप्पांचे बहुमोल सक्रिय योगदान आहे. दि. १८ जून संकष्टी चतुर्थीच्या दिवशी त्यांच्या घरी मराठे प्रतिष्ठानची बैठक भरली होती. त्यावेळी त्यांनी कार्यकारिणीतील सदस्यांना काही महत्त्वाच्या सूचना केल्या आणि मराठे प्रतिष्ठानची धोरणे कशी असावीत याविषयी मार्गदर्शन केले. त्यांच्या निधनाने मराठे परिवारातील एक तेजस्वी मोती निखळून पडला आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. आप्पा खांबेटे यांना भावपूर्ण आदरांजली!

**– संपादिका**

# कॅमेरा...

• रघुवीर मराठे (पृ.४२२), बडोदे दूरध्वनी : ९८७९११८१८३३



**मी** जेव्हा कॅमेरा खरेदी करण्याचे नक्की केलं तेव्हापासून माझ्या जीवनांत उलथापालथ व्हायला सुरुवात झाली. माझा परिवार, नातेवाईक, मित्र सगळ्यांनी माझ्या विरुद्ध मोर्चा उघडला होता.एवढ्या सगळ्या लोकांत मला सपोर्ट करणारे हाताच्या बोटावरच होते. उत्तम कॅमेराच कशासाठी खरेदी करायचा? सर्वजण हाच प्रश्न करत होते आणि त्या सर्वांसमोर माझं एकच उत्तर होत कां नाही घ्यायचा? वाट्टेल ते झालं तरी चांगला कॅमेरा विकत घ्यायचा हा माझा ठाम निर्णय बघून सगळ्यांनी नमतं घेतलं. ही काही निर्णय बदलणार नाही. कॅमेरा विकत घ्यायला जेव्हा मी दुकानात गेले तेव्हा माझ्या उत्साहाला सीमा नव्हती. त्याचे वर्णन करणे इथे शक्य नाही असं वाटत होत की वर्षानुवर्षे मनात जपलेलं स्वप्न साकार होतंय. जणू काही अंद्धकारमय काळ्याभोर रात्रीनंतर उद्याचा प्रकाश किरण नजरेत भरत आहे. कदाचित हे माझ्यासाठीच पहिल्यांदाच असं असेल. माझ्यासाठीच मी हे खरेदी करत आहे. आदर वाटण मला माहित आहे स्वाभाविक आहे. मला माझ्या आवडीसमोर अनेक अडचणी आणि अवरोध उभे रहाणार आहेत. त्या सगळ्याला सामोरं जायची माझी तयारी आहे. सकाळी प्रभातफेरी करण्यासाठी जायला निघाले हल्ली त्याला फॅशनेबल नाव मॉर्निंगवॉक आहे. बरोबर कॅमेरा होता, सकाळीच पाऊस पडून गेल्यानंतरच वातावरण होत. छान हिरवगार सगळीकडे झालं होत. अशावेळी माझी नजर एका ठिकाणी स्थिर झाली एक सुंदर मोर आपला पिसारा फुलवून डौलदार नाचत असताना बघितला आणि माझी बोटे कॅमेऱ्यावर स्थिर होऊन पहिला स्नॅप घेतला. तेवढ्यात एकाने सूचना केली की, एसएलआर आहे आणि एकदम दचकले त्या महाशयाने माझ्याजवळ येऊन टोमणा मारला मुलगी असून ह्या कॅमेऱ्याचे काय करणार? लहान कॅमेरा चालला असता. हा प्रश्न ऐकून त्याला उत्तर द्यायचे यथायोग्य न वाटता मी हसत पुढे निघून गेले. पार्कात लहानपासून मोठ्या वृद्धांपर्यंत सर्वजण माझ्याकडे आश्चर्याने पाहत होते. त्यातील एक चुणचुणीत मुलगी माझ्याजवळ येऊन म्हणाली आंटी. माझा एक फोटो काढा ना! आणि अशा काही पोजेस द्यायला सुरुवात केली मी पण खूष होऊन दोन तीन फोटो काढले आणि तिथून निसटले. आता रोज रोज असं नवनवीन काहीतरी आणि मजेदार घटना घडत होत्या. माझ्या कॅमेऱ्यात सुंदर विलोभनीय आणि मनोरम दृश्य जमा होतच होती. आजूबाजूची दुनिया पण रोजच्यारोज बदलत आहे. माझ्या कॅमेऱ्याच्यामुळे लोक आता सावध झालीत. खासकरून पार्कात जे भेटायला म्हणून येत असत ती माणसं सावध झाली. एक गोष्ट तितकीच सत्य की त्यामुळे लोकांशी मैत्री पण होत होती. एकेकाळी 'ब्लॅक अँड व्हाईट'चा शौक असणाऱ्या एका वडील गृहस्थाने त्याबाबतीत चांगल्या टिप्स पण दिल्या. एवढच नाही तर माझ्यासाठी रोज दहा मिनिटे ते फोटोग्राफी शिकवायला पण लागले. माझ्या समवयस्क मुली लग्नासाठी पोर्टफोलिओ पण तयार करून घेऊ लागल्या. मी त्यांच्या बरोबरीची असल्यामुळे त्यांना कम्फर्टेबल वाटत असावं.

कालचीच गोष्ट रोजच्याप्रमाणे मी ऑफिसला जाण्यासाठी तयार होत होते तेवढ्यात अचानक डोअरबेल वाजली दरवाजा उघडला ते समोरच्याच कॉलनीतील एक आजी उभ्या होत्या. आणि मला सांगायला लागल्या की तुझ्या मदतीची जरूर आहे. मी विचारलं कसली मदत? मुली, माझ्या मुलीला बघायला मुलाकडची माणसं येणार आहेत त्यांना आमची मुलगी आणि आम्हाला मुलगा पसंत आहे आत्ताच साखरपुडा करायचं म्हणताहेत फोटोग्राफरला फोन केला तर त्याला वेळ नाही तू येऊन फोटो काढलेस तर बरं होईल तुझ्याजवळ पण चांगला कॅमेरा आहेच ना? माझा गोंधळ उडाला आत्तापर्यंत मी पक्षी आणि निसर्गाचेच फोटो काढलेत ह्याशिवाय बाकीचे फोटो काढण्यात मला बिलकूल इंटरेस्ट नाही.

मी सांगितलं हे बघा मी साधेपणात मानते. मला वेगवेगळ्या पोजेसमध्ये फोटो घ्यायला जमणार नाही. तुम्ही तुमचं काम करत रहा मला जी पोज चांगली वाटेल त्याप्रमाणे मी फोटो घेत राहीन.

माझं सांगणं ऐकल्यावर त्या एवढ्या खूष झाल्या आणि माझ्याशी संमत पण झाल्या. ऑफिसला फोन करून मी त्यांच्याबरोबर माझा कॅमेरा घेऊन निघाले. मी गेल्यावर साखरपुड्याला सुरुवात झाली. मला जे क्षण चांगले वाटले ते टिपले कॅमेऱ्यात. दोन तासांत साखरपुडा संपला. मी आजींना उद्या संध्याकाळी यायला सांगून निरोप घेऊन घरी आले.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आजी माझ्या घरी आल्या. मी घेतलेले फोटो बघून खुष झाल्या आणि म्हणाल्या तू तर खरोखर फोटोग्राफर पेक्षाही फोटो छान काढले आहेत. फोटो घेऊन जाताना टेबलावर एक कव्हर ठेवून गेल्या मी बघितलं तर त्यांत पैसे होते. ते माझ्या मेहनीतीची कमाई होती. दुसऱ्या शब्दांत सांगयचेच झाले तर कॅमेऱ्याने स्वतःची किंमत करून घेतली. असं तर अजून बरेच चढ उतार येणार आहेत. अनेक अडचणी माझ्या मार्गांत येणार आहेत. कित्ती कित्ती चॅलेंजेस.पण माझा कॅमेरा माझा मित्र आहे मग मला चिंता कशाची? असा विचार करून माझ्या चेहऱ्यावर हसू झळकलं आणि मी दुसऱ्या दिवशीचा प्लॅन करण्याच्या मागे लागले. माझी हळूहळू प्रसिद्धी होऊ लागली. तसे मला बरे वाईट अनुभवपण यायला लागले.अशाच एका सोशल फंक्शनमध्ये एकजण लगट करायचा प्रयत्न करत होता. त्याला तिथल्यातिथं त्याची जागा दाखवल्यामुळे मला ते काम सोडून द्यायची गर्भित धमकी पण दिली. मी तिथल्या तिथे काम सोडून निघून गेले. त्यांना वाटलं असेल माझा उदरनिर्वाह ह्यावर आहे. सगळी इथंभूत माहिती कळल्यावर आले. सरळ माफी मागितली. पुढे मी त्यांचं सेशन पूर्ण केलं. एकदा एका फोटोग्राफरच्या षष्ट्यब्दीपूर्तीनिमत्त बोलवलं. कार्यकर्त्यां ना मी म्हटलं अहो मी बाई माणूस आहे आणि ज्यांचे फोटो काढायचे आहेत ते ब्लॅक ॲण्ड व्हाईट फोटो काढण्यातील एक्स्पर्ट आहेत. ते म्हणाले त्यांच्याच आग्रहामुळे आम्ही तुम्हाला संपर्क केला. ते तुम्हाला चांगले ओळखतात. सर्व कार्यक्रमाचे फोटो झाल्यावर त्यांच्याबद्दल दोन शब्द मी बोलले आज माझ्या सगळ्या प्रयत्नांच्या मागे ह्या माणसाचा छुपा पाठींबा होता. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली मी बरेचसे काही शिकले, शेवटी समारोपात सांगितलं की कॅमेरा है? आणि टाळ्यांच्या गडगडाटात माझे मोजके दोन शब्द संपवले.

♦

# सहवेदना

कै. सिताराम गोपाळराव खांबेटे यांचे नुकतेच दुखःद निधन झाले. त्यांचा माझा परिचय साधारणपणे आपल्या १९९२च्या कुलवृत्तांत आधीच झाला होता. त्यावेळेस माझे आजोबा कै. वैद्य रा.शि. मराठे यांचे घरी कोथरूडला आले होते. बहुतेक कुलवृत्तांताकरिता माहीती संकलन करण्याचे निमित्ताने भेट झाली. त्या वेळेस 'हितगुज'चे सभासद माझ्या आजोबांना करून घेतले असावे बहुतेक.

एकदा पुणे शाखा वर्धापनदिन कार्यक्रमात आगामी स्नेह संमेलनानिमित्त सभासद होण्याचे आवाहन केले होते. त्या नंतर मी 'प्रतिष्ठान'चा सभासद झालो. पुणे शाखेत सौ. निलांबरी ताई, अरूण राव हे कार्यरत होते.

'प्रतिष्ठान'चा कार्योपाध्यक्ष झाल्यावर खरेतर सी. गो. बरोबर कायम संपर्कात असायचो. त्या काळात सुद्धा संपर्काची साधने नसताना नवीन आजीव सभासद तसेच 'हितगुज'चे सभासद करून घेणे, कुलवृत्तांता संबंधित परिवारातील सर्वांचीच माहीती घेणे, निधी संकलन करणे या कामातील त्यांची चिकाटी लक्षात येते. तसेच प्रतिष्ठान वाढीची कळकळ जाणवते. या वयात सुद्धा संगणकीय कामाची माहीती असणे आणि काम करणे हे कौतुकास्पद आहे. त्यांच्या संगणकात बऱ्याच सभासदांची माहीती जमा केलेली होती.

पुढे 'प्रतिष्ठान'चे विश्वस्त म्हणून उल्लेखनीय काम केले. कै. रमाकांत विद्वांस याच्या अकाली निधनानंतर पुढील निवडणूक होईपर्यंत 'प्रतिष्ठान'चे कार्याध्यक्ष पद पण भुषविले.

'हितगुज'चे त्रैमासिक वाचनीय कसे होईल, यातील लेख संकलन करण्यात महत्त्वपूर्ण योगदान. तसा मुळ स्वभाव थोडा हट्टी, तात्विक मतभेद जरूर पण त्यानंतर एकमेकांतील संवाद चालु होत असत.

प्रत्येक संमेलनात 'प्रतिष्ठान'च्या कामाचा तपशील व्यवस्थितपणे उलगडणे. नवीन उपक्रमाची माहीती देणे. कै. सि. गो.नी 'प्रतिष्ठान'च्या सर्वच पदावर उल्लेखनीय कामे केली.

मी एप्रिल मध्ये 'प्रतिष्ठान'चे काही कामानिमित्त त्याच्या घरी गेलो होतो. तब्येत ठीक असो वा नसो प्रत्येक मासिक मिटिंगला न विसरता उपस्थित रहात असत. कै. सि.गो.च्या अकाली निधनानंतर 'मराठे प्रतिष्ठान'ची न भरून येणारी मोठी हानी झाली.

सि. गो. खांबेटें यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**– विजय मराठे**

*कार्याध्यक्ष मराठे प्रतिष्ठान*

# तुम्हीच तुमचे डॉक्टर व्हा

• मोहन मराठे (पृ.४२१), बडोदे

**का**ही महीन्यापूर्वी बडोद्यातील एका नामांकित डॉक्टरचे दमा विकारावरील भाषण बडोदा आकाशवाणीच्या आपल्या मराठी कार्यक्रमांत ऐकले व तेव्हांपासून आरोग्यावर लेख लिहीण्याचे मनांत घोळत होते आणि आपल्याच आकाशवाणी केंद्रावरून तो लेख वाचून ऐकणाऱ्यांना त्यातून फायदा मिळावा मार्गदर्शन मिळावे ही इच्छा व म्हणून त्यासाठी हा प्रयत्न केलाय.



आमचे सर्व कुटुंब गेल्या १०० वर्षापासून औषधाच्या व्यवसायाशी निगडीत त्यामुळे घरात लहान सहान शारीरिक तक्रारींसाठी औषधांची पूर्ण माहीती. त्यांत वडीलांना आयुर्वेदीक व ऍलोपेथीक औषधांचा कसा किती प्रमाणात वापर करावा याचे निसर्गतःच ज्ञान. त्यामुळे त्यांच्या सतत संपर्कात असल्यामुळे थोडे बहुत मला ज्ञान. लहानसहान तक्रारींसाठी कधीही दुकानांतून औषध आणल्याचे मला माहीत नाही आणि दुकानांत बसल्याबसल्या पुष्कळदा असा विचार यायचा की आपण आपल्या दुकानांतील औषधांचा कमीतकमी वापर करतो तो का? असा मनाला प्रश्न विचारल्यावर उत्तर मिळायचे की आपल्या प्रकृतीची तसेच कुटुबातील प्रत्येक व्यक्तिंची जडणघडण पूर्णपणे माहीत असल्यामुळे आपल्याला काय मानवते काय नाही त्यामुळे तब्येतीत जास्त बिघाड होत नाही व लहानसहान कुरबुर असली तरी घरातील औषधांनी (विशेषकरून आयुर्वेदिक) दूर होते आणि मग विचार आला की आपण डोकेदुखी सर्दीसाठी एक महीन्यात औषधाच्या किती गोळ्या खाल्ल्या? तेव्हां त्याचे उत्तर ...एक महिन्यातच काय पण एक वर्षात आपण एकही गोळी सर्दी पडशासाठी, खोकल्यासाठी, डोकेदुखीसाठी वापरली नाही. आणि मग डोक्यात विचार आला की आपण सकाळी दुकान उघडतो तेव्हां पहिले गिऱ्हाईक तसेच रात्री दुकान बंद करतो तेव्हाचे शेवटचे गिऱ्हाईक एस्प्रो एनासीन क्रोसीन कोल्डारीन नोव्हाल्जीन डायजीन अथवा जाहेराती वाचून ते औषध घ्यायला आलेले असते. म्हणजे सबंध दिवसात ह्या गोळ्यांचा आपल्या दुकानात किती खप? आणि बडोद्यात किती खप? मग असे वाटते कि तात्पुरता आराम मिळावा म्हणून लोक निष्कारण नाही नाही ती औषधे खातात आणि त्याचा दुरगामी दूष्परिणाम ओढावून घेतात की ज्याचे निदान नामांकित डॉक्टरनाही होत नाही. आणि मग माझ्या आईवडीलांचे एक वाक्य आठवते आणि ते म्हणजे आपण स्वतः स्वतःचे डॉक्टर झाले पाहीजे. कसे? असे विचारले तर? आपली तब्येत बिघडली तर आपणच आपल्याला प्रश्न विचारायचा. कालपर्यंत आपल्याला बरे होते आज सकाळी ऊठल्यावर आपल्याला बरे नाहीसे का झाले? आपले शरीर आपल्याला सूचना देत असते. परंतु आपण त्याकडे दुर्लक्ष करून विकार वाढवितो. उदा. खोकला व्हायचे अगोदर घसा खवखवतो, सर्दी ताप येण्यापूर्वी त्याची कारणे आपल्याला कळत असतात. परंतु थोडेसे अंगावरच काढून आपण विकार बळाविण्यास आमंत्रणच देतो. शरीराचे ७०% ते ९०% विकार हे पोट साफ नसल्यामुळे उद्भवतात असे माझे मत आहे. तेंव्हां पहिला प्रश्न शरीरासाठी विचारला की शौचास सकाळी साफ झाले का? आणि उत्तर नाही आले तर का झाले नाही? काल अथवा गेल्या ३/४ दिवसांत काय कमी जास्त खाणे पिणे झाले? ह्यावरून तब्येत का बिघडल्याचे उत्तर मिळेल. समजा तब्येत बिघडण्याचे हेच कारण असेल तर त्यावर लंघन करून अथवा पोट साफ होण्याची गोळी घेऊन तब्येत ठिकाणावर आणता येईल. पोट साफ नसल्यास अनेक व्याधी उद्भवतात उदा. पाईल्स, डोके दुखणे, मळमळणे, ऍसिडीटीचा त्रास, सर्दी घसा खवखवणे, पोटात वायू धरणे, गॅसेसमुळे चक्कर येणे. आता ह्या व्याधींवर औषधे घेतली तर अपायकारक ठरणार. शौचाची गोळी न घेता म्हणजेच पोट साफ करण्याचे उपाय न करता डोके दुखते म्हणून एस्प्रो एनासीन क्रोसीन खाणे, पाईल्स होतात म्हणून बाह्योपचार करणे चुकीचे. समजा तब्येत वरील कारणांमुळे न बिघडता इतर काही कारणांनी बिघडली, म्हणजे एकदम ताप आला, डोके दुखु लागले, ब्लड प्रेशर वाढले, उलट्या झाल्या, जुलाब झाले, शरीराला कंड येऊ लागली तरी आपण आपल्यालाच प्रश्न विचारून तक्रारीचे (शरीर अस्वस्थ्याचे) कारण शोधू शकतो

व त्याप्रमाणे उपाय करून प्रकृति नॉर्मल ठेवू शकतो. उदा. सर्दी झाली? कशाने झाली? आपण रात्री दारासमोर उघडे झोपलो होतो का? पावसांत भिजलो होतो का? डोक्यावरून आंघोळ करून लगेच स्कुटरवरून फिरलो होतो का? कानांत कापसाचे बोळे न घालता वाऱ्यावर फिरलो कां? या प्रश्नांच्या उत्तरांवरून सर्दी का झाली ह्याचे उत्तर मिळेल व त्यानुसार घरगुती औषधे वापरून सर्दी बरी करता येईल. ब्लड प्रेशर एकदम वाढले अथवा कमी झाले तरी आपण आपल्यालाच प्रश्न विचारून त्याचे उत्तर मिळवून बी.पी.नॉर्मल आणण्यासाठी उपाय करू शकतो. कसे? तर आपण टेन्शन येईल अशी कामे करतो का? अथवा कोणाशी बोलाचाली होऊन प्रेशर वाढले का? मनाच्या कोंडमाऱ्याने प्रेशर कमी जास्त झाले का? नको असलेला आहार नित्यनेमाने घेऊन वातप्रकृति वाढवून ब्लडप्रेशर कमी जास्त झाले का? ह्या प्रश्नांची उत्तरे आपण आपल्या आहारविहारात योग्य तो बदल करून मिळवू शकतो व बी.पी. नॉर्मल होण्यासाठी त्याचा उपयोग करून घेऊ शकतो. हल्ली त्वचा रोगांचे प्रमाण अतिशय वाढले आहे. त्याची कारणे विचारली तर मशिनरी लाईफ मुळे धकाधकीचे जीवन! त्यात अमाप लोकवस्ती, त्यात सिन्थेटीक फायबर्सची वस्त्रे, त्यात पान तंबाखू सेवनाचे वाढते प्रमाण ज्या योगे पोटात उष्णता वाढून शरीरास कंड येणे, सिन्थेटीक फायबर्सची एलर्जी इत्यादींमुळे त्वचा रोग उद्‌भवू शकतात. ह्यावर ज्याचा त्याने विचार करून जास्त संसर्गात न येता अथवा सिन्थेटीक कापडांचा उपयोग न केल्यास, पान तंबाखूचे प्रमाण कमी केल्यास, त्वचा रोगांचे निर्मुलन होऊ शकते.

वरील शरीराच्या व्याधी ह्या आपण आपणांस प्रश्न न विचारतां आपल्या अपुऱ्या वाचनानें अथवा अपूर्ण माहीतीनें त्यावर औषधे बाजारातून आणून नको असलेली द्रव्ये शरीरांत घुसडवून उद्‌भवतो. हल्ली सर्रास क्रोसीनचा डोकेदुखी साठी उपयोग केला जातो. परंतु ते माझ्यामते साफ चुकीचे आहे कारण क्रोसीन म्हणजे पॅरासिटेमॉल हा ड्रग एन्टीपायरेटीक आहे म्हणजे शरीराचे तापमान उतरविण्यास उपयुक्त आहे. शरीराचे तापमान १०३ फेरनहीटचे पुढे गेल्यास हा ड्रग देऊन ते टेम्परेचर खाली उतरविले जाते व त्या दरम्यान ताप कशाने आला आहे त्याचे निदान लावून योग्य ती ट्रीटमेंट सुरू करता येते. ताप डोक्यात गेल्यास फारच नुकसानकारक असतो म्हणून घरगुती उपाय म्हणून कांदा किसून डोक्यावर बांधला तर ताप कमी होतो. मध्यंतरी माझ्याच मुलीचे टेम्परेचर १०४° गेले असताना तिने डोळे फिरवले धावपळ झाली डॉक्टरना बोलवायची पाळी आली डॉक्टर येईपर्यंत माझ्या वडीलांनी वेखंड उगाळून त्याचे चाटण मुलीच्या जिभेवर फिरवतां दोन मिनिटांत मुलगी शुद्धीवर आली. त्यानंतर डॉक्टर आल्यावर त्यांनाही प्रश्न पडला की आता हिला काय तपासायची व काय औषध द्यायचे. तेंव्हा सांगायचे तात्पर्य इतकेच की आपण क्रोसीन, एनासीन, एस्प्रो, नोवाल्जीन, एन्ट्रोवायोफार्मचा जास्तीत जास्त उपयोग करून नको असलेली द्रव्ये शरीरांत घूसडवून नवीन व्याधी उद्‌भविण्यास आमंत्रण देतो. व असे व्याधीचे निदान एम.बी.बी.एस./ एम.डी. सुद्धा करू शकत नाही. शेवटी कसले तरी इन्फेक्शन म्हणून एम्पीसिलीन टेट्रासायक्लीन वगैरे देऊन व्याधी दबविल्या जातात. ह्या औषधांची आपणांस जरूरी नसतांना तात्पुरत्या आरामासाठी आपण डॉक्टरी सल्ल्याने ती औषधे घेतो. आता ह्या औषधांचा जो डोस नक्की केलेला असतो तो पूर्ण शरीरात जाणे आवश्यक असते. सर्वसामान्यतः एम्पीसिलीन टेट्रासायक्लीन च्या दोन तीन कॅपसुल सेवनाने आराम मिळतो व पेशंट लिहून दिलेल्या कॅपसुल पूर्ण करीत नाही व व्याधी बळावतो. टायफॉईडच्या केसमध्ये क्लरोमायसेटीन २५० पानावर अमुक इतके मि.ग्रा. पोटात जायला हवे. आता पेशंटने हव्या असलेल्या प्रमाणांत ते न घेतल्यास टायफॉईड उलटतो. वरील व्याधी पुन्हा बळावल्यास ब्रॉड स्पेक्ट्रम उपचारपद्धतीचा वापर केला जातो. एन्टीबायोटीक्स ड्रग्सचा जास्त वापर करणे हे शरीरास अपायकारक आहे. तेव्हा सुरुवातीलाच योग्य ते औषध योग्य प्रमाणांत घेतल्यास पुढील दूष्परिणाम टाळू शकतो. आपल्याला जरा बरे नसले कि आपण डॉक्टरकडे धाव घेऊन औषध घेऊन मोकळे होतो. परंतु आपण आपली प्रतिकारशक्ती वाढवायचा प्रयत्न करीत नाही. पूर्वी आजीबाईंचा बटवा ज्याला म्हणायचे अशा औषधांची ओळख करून घेतली, त्याची माहीती मिळविली, तर उठसूठ डॉक्टरकडे जावयास लागणार नाही. उदा. मध्यंतरी मला एका ठिकाणी जेवावयास गेलो असताना जेवणाचा जास्त आग्रह झाल्यामुळे घरी आल्यावर दोन उलट्या झाल्या व पोट अनस्टेबल वाटावयास लागले. माझ्या वडीलांनी ताबडतोब एक टेबलस्पून युकॅलिप्टस म्हणजेच निलगिरी तेल साखर घालून गिळण्यास सांगितले. पांच मिनिटांतच पोट स्टेबल नॉर्मल झाले. मी ॲलोपेथीक औषधांचा अथवा डॉक्टरांचा विरोधक नाही परंतु ॲलोपेथीक औषधांचा गुण हा टेम्परररी असतो आणि रोग अथवा व्याधी मुळातून घालवायची त्यांत ताकद नसते. त्याशिवाय साईड इफेक्ट जरूर असतात. आणि ते दूर करण्यासाठी पुन्हा दुसऱ्या औषधांची जरूर भासते. ॲलोपेथीक औषधांचा समयानुसार उपयोग केला तर तेच हितावह ठरते उदा. फेटल एक्सीडेन्ट, सर्जरी, डायरीया, दमा, डेन्टल ट्रीटमेंट वगैरे.

हल्ली बायोकेमिक व होमीयोपेथीक थेरपीही बरीच प्रगत

झालेली आहे. ह्या थेरपीची पुस्तके सगळ्याच भाषेत प्रकाशित झाली आहेत. ही पुस्तके वाचून त्याचा आपल्या शरीरास सुदृढ ठेवण्यांस बराच उपयोग होईल. माझ्या ह्या लिखाणाचे हेडींग तुम्ही तुमचे डॉक्टर व्हा त्याची सांगता देखील ह्या पुस्तक वाचनाने आणि आचरणाने होऊ शकेल.

मी आत्तापर्यंत एलोपेथीक आयुर्वेदीक बायोकेमिक होमीयोपेथीक औषधासंबंधी बोललो व त्या कोणत्याही थेरापीचे मी कॅनवासींग करतोय असेही नाही. म्हणून मला असे म्हणायचे आहे की शरीर सुदृढ सशक्त ठेवायचे असल्यास योग्य मार्गदर्शनाखाली योगासनांचा ऊपयोग केला तरी आपण आर्थिक दृष्टीने शारिरीक दृष्ट्या मानसिक दृष्ट्या सशक्त राहू फक्त आपणच आपले डॉक्टर झालो तर!!! ♦

# सहवेदना

सिताराम गोपाळ खांबेटे उर्फ सि.गो. सन २००० साली आमच्या नालासोपारा येथे मालाड येथून रहायला आलेले पद्माकर मराठे यांनी 'मराठे प्रतिष्ठान' आयोजित बोरीवली येथील विभागीय मेळाव्याचे पत्रक मला दिले. तोपर्यंत करीअरच्या मागे असल्याने अशी काही परीवाराची संस्था वगैरे बद्दल काहीच माहिती नव्हती. उत्सुकतेने मी बोरीवली येथे गेलो. तिथे सुरेशभाऊ, वि.के., लक्ष्मणराव व सी.गो. यांची ओळख झाली व लगेच मी सभासद झालो. पावती खांबेटे यांनीच बनवली होती. यामधील सुरेश भाऊंची पुन्हा भेट होण्याचा योग आलाच नाही कारण त्यांच अचानक निधन झालं. त्यानंतर मी अधूनमधून प्रभादेवी ला जाऊ लागलो. वि.के., लक्ष्मणराव व सि.गो. असं त्रिकुट. यांच्याकडून खूप गोष्टी बोलता-बोलता कळत गेल्या. मला काही कार्य करायचे असल्याने अंक वितरण सुचवले गेले. मात्र प्रत्यक्षात कार्य दिलं जातं नव्हतं. मग एकदा मी अरविंदराव मराठे यांना सांगितले लगेच अंक वितरणासाठी मिळू लागले. भाईंदर ते विरार समस्त मराठे परीवाराकडे मी अंक घेऊन जात असे. काही अपवाद वगळता प्रतिसाद चांगला होता. अशा प्रकारे मी 'प्रतिष्ठान'शी जोडला गेलो व या त्रिकुटाकडून घडत गेलो. या त्रिकुटापैकी वि.के. व लक्ष्मणराव २०१५ साली मागोमाग गेले व आता सि.गो. पण गेले. मी खूप वेळा त्यांच्या घरी गेलेलो आहे. त्या काळात दोन दोन संगणक घरात सुरू असायचे. अफाट ज्ञानाचा खजिनाच होता त्यांच्याकडे. नावं सांगायची खोटी की यांची पुढचं सांगायची सुरुवात.

मागच्या वर्षी बडोदा येथून एक फोन मला आला व त्यांनी विचारले साने हे मुळ मराठे मधेच आहे याचा काही संदर्भ मिळेल का? मी म्हटलं एवढ्या वर्षात मी तरी कोणाकडून ऐकलं नाही मात्र मी सि.गो. ना विचारतो. त्यांना फोन केला व सांगितले, लगेच म्हणाले अरे बरोबर म्हणताहेत ते, संदर्भ आहे कुलवृत्तान्तात. काहीच वेळात पृष्ठ क्रमांक सांगितला त्यांनी व म्हणाले इथे संदर्भ आहे. पण आता साने हे वेगळे घराणे म्हणूनच गणले जाते, मराठ्यांमधे नाही. माझ्याकडून बडोद्याचा नंबर घेऊन बोलले पण लगेच. मी माझी चांगली ओळख झाल्यापासून त्यांना चालता बोलता कम्प्युटरच म्हणतो.

अशा या सि.गो. खांबेटें बद्दलच्या गोष्टी सांगाव्यात तेवढ्या कमीच आहेत. आता ते आपल्यात नाहीत हे लिहीतानाही खूपच त्रास होतो आहे. कोणतीही गोष्ट विचारा, उत्तर येणार. अफाट जनसंपर्क होता. मी व्यक्तीशः या त्रिकुटापासून खूप काही शिकलो आहे. व महत्त्वाचे म्हणजे यांच्यापैकी एकाच्याही अंत्यविधीसाठी मी काही ना काही कारणाने उपस्थित राहू शकलो नाही याची खंत कायम वाटत राहील.

ईश्वर सि.गो. खांबेटें यांच्या आत्म्यास शांती देवो हीच प्रभुचरणी प्रार्थना!

– **हेमंत मराठे** (पृ. २१), नालासोपारा
*कार्यवाह मराठे प्रतिष्ठान*
भ्रमणध्वनी : ९६२२८४७१२०

# सहवेदना



'मराठे प्रतिष्ठान'च्या सभासद श्रीमती मीनाक्षी मुकुंद बापट यांचे दि २७/११/२०२२ रोजी वयाच्या ७६ व्या वर्षी दुःखद निधन झाले. अमरावती येथील सभासद श्री संजय मराठे यांच्या त्या भगिनी होत. मराठे प्रतिष्ठान कडून भावपूर्ण श्रद्धांजली



पुणे येथील सभासद श्रीमती पुष्पा विष्णु मराठे, वयाच्या ८५ व्या वर्षी दि २४/११/२०२२ रोजी अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. मराठे प्रतिष्ठान चे कार्याध्यक्ष श्री विजय मराठे यांच्या त्या मातोश्री होत. मराठे प्रतिष्ठान कडून भावपूर्ण श्रद्धांजली

# आई म्हणजे, आई म्हणजे... आई असते, तुमची आमची सेम असते

• प्रा. संजय रामचंद्र मराठे (पृ.४१६), अमरावती भ्रमणध्वनी – ९४२१७४०८९४

*आई म्हणजे, आई म्हणजे....आई असते.*
*सर्व लेकरांची आवडती माय असते.*
*नातवंडे म्हणजे, तीच्यासाठी दुधावरची साय असते.*
*सामान्यांची, सेलिब्रिटीची सर्वांची सेम असते.*
*आई म्हणजे, आई म्हणजे, आई असते*


श्रीमती जानकीबाई रामचंद्र मराठे

पितृपक्ष नेहमी पितरांचे आणि पितृऋणाचे स्मरण जागवतो. तसे आई वडिलांचे विस्मरण कधी होतच नाही. सुखात आणि दुःखात आपणास त्यांची आठवण कायम असते. कारण ते त्यांच्या संस्काराचे फलित असते. गर्भात असल्या पासूनच आपली नाळ आईशी जुळली असते. जन्मानंतर थोड्या दिवसांनी नाळ पडते पण ती शारीरिक. वास्तवात मात्र ती कधीच तुटत नाही. आई बद्दल लिहायचे तर शब्द थिटे पडतात. पण आज तिच्या तिथी निमित्ताने थोड्या भावना व्यक्त करतोय.

प्रायमरीत असतांना व्यक्तिगत कारणांमुळे कधी गुरुजींची छडी खाल्ली नाही. पण गोंगाट केला म्हणून वर्गातील सर्वांना छडीचा प्रसाद मिळे तो मला ही मिळाला आहे. सरांच्या छडीचा हातावर सप्पकन होणारा आवाज आणि आमचा आई....गं. च्या किंचाळीचा प्रतिसाद आजही आठवतो. माध्यमिक शाळेपर्यंत आमच्या वेळी फिजिकल पनिशमेंटची नव्हाळी नव्हती. आमचा एक वर्गबंधू सरांनी शिक्षा देण्याआधीच, आई..ग... आई करायला लागायचा, ओरडायला लागायचा. त्यामुळे त्याचे टोपणनावच आई....गं पडले होते. सर ही तो काही चुकला की त्याच टोपणनावाने त्याला जवळ बोलवायचे आणि मस्तपैकी पोटापाशी चिमटा काढायचे.

आई सर्व लेकरांवर सारखीच माया करते. मग ते आजच्या जमान्यातले एकुलते एक असो, की पुर्वीसारख्या खंडीभर भावंडातील, इतरांच्या दृष्टीने नगण्य असणारा एक असो. घरातील इतर भावंडे ती एखाद्या वर जास्त प्रेम करते असा बरेचदा आरोप करतात. पण तिच्या अंतरंगात डोकावले तर ह्या आरोपात अजिबात तथ्य नाही हे लक्षात येते. तिच्यासाठी कोणीच आवडते किंवा नावडते नसते. कारण आई म्हणजे, आई म्हणजे... आईच असते. कमजोर भावंडाकडे ती जास्त लक्ष देते असे, बलवान भावंडांना उगाच वाटत असते. आम्ही एकुण नऊ भावंडे. पाच भाऊ आणि चार बहिणी. पण तिच्या लेखी कोणताही भेदभाव नव्हता. अगदी मुलगा/मुलगी हा सुद्धा नाही. इतरांच्या लेखी मी जरा आळशी असल्याने त्यांना वाटायचं की ती माझी जरा जास्त काळजी घेते. पण तिच्यासाठी आम्ही नवरत्नच होतो. माझे सर्वात मोठे भाऊ आणि माझ्यात सुमारे एकवीस वर्षांचे अंतर. पण तिच्या लेखी मोठा काय, लहान काय याबाबत काहीच भेदभाव नव्हता. मोठ्याला दही आवडतं म्हणून त्याच्यासाठी घरचे दही. आणि मला आवडते म्हणून गाईचे धारोष्ण दुध. आमच्याकडे गाय आणि घरची थोडी शेती होती, पण शेतीचे उत्पन्न अगदी नगण्य. वडील जुन्या काळचे मॅट्रिक आणि संस्कृत मध्ये शास्त्री होते. भिक्षुकी आणि पौरोहित्य यांचा वैदिक अभ्यास त्यांनी गुरुगृही राहुन पुर्ण केला होता. ते भिक्षुकी (पौरोहित्य, पुजापाठ) करीत. पण दक्षिणा कधीच सांगत नसत आणि मागतही नसत. जेवढी मिळाली त्यात समाधान मानीत. त्यामुळे कौटुंबिक उत्पन्न जेमतेमच.

पण मुला-मुलींच्या शिक्षणात आई वडीलांनी कधीच हात आखडता घेतला नाही. पाच भावांपैकी चारजण, उच्च शिक्षण घेतलेले, वेगवेगळ्या विषयात एम.ए., एम.एस्सी. केलेले. आणि धाकटा इंजिनीयर. चारही बहिणी मॅट्रिक झालेल्या. त्याकाळी मुलींची लग्ने लवकरच होत, आणि शाळेत उशिरा म्हणजे सात वर्षे पुर्ण झाल्यावर घेत. त्यामुळे लग्नाच्या वेळे पर्यंत बहिणी मॅट्रिक झाल्या होत्या. काही जणी लग्नानंतर पुढेही शिकल्या. मोठी बहिण तर एम.ए. होऊन एका शाळेत मुख्याध्यापिका झाली. शालेय शिक्षणात मोठ्यांची पुस्तके लहान भावंडांनी वापरायची हा त्याकाळी मध्यमवर्गीय कुटुंबातील शिरस्ताच होता हा शिरस्ता आमच्याही कडे शेंडेफळापर्यंत म्हणजे माझ्या लहान भावा पर्यंत सर्वांनी मॅट्रिक होईपर्यंत पाळला. नंतर प्रत्येकाने वेगवेगळ्या अभ्यासक्रम निवडल्याने त्यानुसार आवश्यक पुस्तके घेतली. आर्थिक परिस्थिती मध्यम त्यामुळे प्रत्येकास दरवर्षी शाळेच्या युनिफॉर्मचे दोन जोड मिळत आणि दसरा/दिवाळीस आणखीन

एक वेगळा ड्रेस मिळे. जसजशी आर्थिक परिस्थिती बदलत गेली, सुधारत गेली, मोठे तीनही भाऊ नोकरीला लागले तेव्हा मी आणि माझा लहानभाऊ कॉलेजात शिकत होतो. त्यावेळी माझ्याकडे बारा शर्ट आणि आठ पॅन्ट होत्या. आम्ही दोघेही भाऊ, पुतणे आणि भाचे तब्बेतीने बरोबरीचे असल्याने घरीच धुवून इस्त्री करून एकमेकांचे कपडे वापरत असू. त्यामुळे सर्वांना एकमेकांचे मिळून वीस, पंचवीस ड्रेसेस सहज वापरायला मिळायचे.

आई वडीलांनी लावलेल्या शिक्षणाच्या गोडीने मी खुप शिकलो, प्राध्यापक झालो. त्यांच्याच आशिर्वादाने मला जलतरण क्षेत्रातील योगदानाबद्दल महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार आणि अमरावती महानगरपालिकेचा महापौर क्रीडारत्न पुरस्कार मिळाला. योग क्षेत्रातील योगदानाबद्दल नॅशनल अवार्ड ही मला मिळाला आहे. या सर्वाचे श्रेय माझ्या आई आणि वडिलांना आहे. त्यांनी केलेल्या संस्कारा मुळेच मी विविध क्षेत्रात कार्य करून नाव कमावू शकलो. आईने केलेल्या संस्कार आणि शिकवणुकीमुळे मी भरपूर लेखन केले, कविताही केल्या. मी माझा नुकताच प्रकाशित झालेला काव्य-पुष्पांजली, संजय उवाचं-अध्याय दुसरा हा काव्य संग्रह आईला समर्पित केलेला आहे.

माझी आई चौथी पर्यंत शिकलेली. पण पाककला, गृहकार्य, विणकाम, भरतकाम यात निपुण. घरच्या कुळाचाराला तिने केलेल्या सुमधुर पुरणपोळ्यांची चव अजूनही जिभेवर रेंगाळते. दिवाळीला तिने काढलेल्या अप्रतिम रांगोळ्या इतकी वर्षे होऊनही नजरेसमोर आत्ताच बघितल्या सारख्या स्मृती पटलावर कोरल्या गेल्या आहेत. तिला अवगत कलांचा हा वारसा आणि वसा तिने तिच्या मुली आणि सुनांना पुर्णपणे हस्तांतरित केला आहे. आमचे वडील घराजवळील श्री दत्त मंदिरात पोथी, पुराणे, नियमितपणे वाचीत. भागवत आणि गुरुचरित्राचे सप्ताह (पारायणे) याच मंदिरात करीत. आई या दत्त मंदिरातील महिलांच्या भजनी मंडळाची क्रियाशील कार्यकर्ती होती. वडीलांच्या पोथी नंतर आईच्या भजनी मंडळाचे भजन होत असे. आणि पोथी, पुराण नसले तरी दर गुरुवारी भजन होत असे. आईने म्हटलेली पंचपदी आणि विविध भजने अजुनही कानात रुंजी घालत असतात, भजन कुठेही लागले की त्या स्मृती जाग्या होतात.

माझ्या आजोळी, आईच्या जन्माआधी झालेली मुले वाचत नव्हती. त्यामुळे आईच्या जन्मानंतर तिचे कौतुक वगैरे विशेष झाले नाही. तिचे नामकरण, बारसे ही झाले नव्हते. तिला लहानपणी घरी बयोच म्हणत. तिच्या नंतर तीन मावशा आणि दोन मामांचा जन्म झाला. ते सर्वजण मोठे झाल्यावर आमच्या आईला आक्का म्हणत. त्यामुळे आम्हीही आईपेक्षा जास्त करून आक्काच म्हणायचो. लग्नानंतर वडीलांनी (त्यांचे नाव रामचंद्र), त्यामुळे आईचे नाव त्यांनी जानकी ठेवले. लग्नानंतरला जानकी मराठे ही ओळख मिळाली. मराठे घराण्याचा आणि कुटुंबाचा वारसा आईने समर्थपणे पुढे चालवला. माझी आजी जास्त करून नवसारीला राहायची. कारण आमची शेती अमरावती पासुन दोन मैलांवर असणाऱ्या नवसारीला होती. माझी आजी गोदुबाई नावाने नवसारी गावात वैद्य म्हणून प्रसिद्ध होती. त्याकाळी गावात कोणी डॉक्टर नव्हता. माझी आजी, तिचं खरं नाव रुख्मिणी, तिच्या बटव्यातील आयुर्वेदिक औषधे द्यायची. लोकांच्या समाधानासाठी विंचू दंश, काविळ, हिवताप इत्यादींवर औषधा सोबत मंत्रोपचार ही करायची. तिच्या औषधांनी आणि मंत्रोपचाराने गुण येत असे. आई आणि वडील दोघांनाही आजी आणि तिच्या गुरु कडून मंत्र घेतला होता. वडील सहसा औषधोपचार आणि मंत्रोपचार करीत नसत. पण आई आजीच्या तालमीत तयार झाली असल्याने गरजूनां आयुर्वेदिक औषधोपचार आणि मंत्रोपचार दोन्ही करीत असे.


आईने औक्षण करुन, तेल उटणे लाऊन, तांब्याच्या बंबातील ऊन - ऊन पाण्याने नरक चतुर्दशी ला घातलेल्या अभ्यंग स्नानाने आमच्या दिवाळीची सुरवात होत असे आणि नंतर तिने स्वतः बनवलेल्या विविध फराळाची चव अजूनही जिभेवर आहे. शेवटी शेवटी म्हातारपणामुळे तिची दृष्टी अधु झाली होती. पण तोपर्यंत आणि दुसरी सून येईपर्यंत तिने स्वयंपाक घर आणि चूल कधी सोडली नाही. त्याकाळी गॅस नव्हता. त्यामुळे स्वयंपाक चुलीवर, वैलावर आणि कोळशाच्या शेगडीवर होत असे. तसे आमचे कुटुंब मुळातच मोठे. आणि उन्हाळा - दिवाळीच्या सुट्टीत पाहुण्यांची सतत वर्दळ असे. माझ्या लहानपणी उन्हाळा, दिवाळी च्या सुट्ट्या साजऱ्या करण्यासाठी आलेले भाचे, भाच्या आणि घरचे पुतणे, पुतण्या धरून पंधरा वीस बालगोपाल सकाळी चुलीपासुन दूर गोलाकार पाने मांडुन जेवायला बसायचो. आई गरमागरम पोळी/भाकरी करुन आम्हाला वाढायची. प्रत्येक पोळी/भाकरी नंतर उठून वाढणे तिला जमायचे नाही शिवाय पोळी/भाकरी बनवण्यात खंड पडायचा. त्यामुळे ती चुलीजवळ बसल्या जागेवरुनच पोळी/भाकरी फेकुन आमच्या पानात वाढायची. एखाद्या उत्कृष्ट क्षेत्ररक्षकाने सीमेवरुन फेकलेला चेंडू डायरेक्ट अचुकपणे स्टंपवर आदळावा तशी आमच्या आईने चुलीपासुन फेकुन वाढलेली पोळी/भाकरी बरोबर ज्याला वाढायची आहे त्याच्याच पानात अगदी बरोबर मधोमध पडे.

अशी होती आमची आई. देहाने जरी आता आमच्यात नसली तरी आमच्या कुटुंबातील सर्वांच्या हृदयात तिच्या आठवणी कायम कोरलेल्या आहेत.

E-mail : srmarathe 53@gmail.com

# आंबिल ओढ्याचा इतिहास थोडक्यात!!

• सौरभ मराठे (पृ.३१६), पुणे
भ्रमणध्वनी – ९८६०५६१११३




काही शतकांपूर्वी आजच्या पुण्याच्या मध्यभागातून दोन भरपूर पाण्याने वाहणारे ओढे वाहत असत. त्यापैकी एक नागझरी आणि दुसरा आंबिल ओढा. काही शतकांपूर्वी हा आंबिल ओढा आज जी भरवस्तीची ठिकाणे आहेत त्यातूनच वाहत असे. शनिपाराजवळ असलेल्या भाऊ महाराज बोळाच्या पश्चिमेस.... म्हणजे जिलब्या मारुती जवळून वाहणारा हा ओढा पुढे जोगेश्वरीवरून शनिवार वाड्याच्या जवळ असलेल्या अमृतेश्वर मंदिरापाशी मुठा नदीला मिळत असे. आज ही गोष्ट खरी वाटणार नाही. पण जोगेश्वरी, शनिपार ह्या एकेकाळी पुण्याच्या सीमा म्हणता येतील. जिलब्या मारुती मंदिर परिसरात ह्याच ओढ्याच्या काठाशी स्मशान होते हे सांगितले तर विश्वास नाही बसायचा.

पुण्याचा दक्षिणेस असलेल्या कात्रज पासून ह्या आंबिल ओढ्याची सुरुवात होते. भरपूर पाणी असणारा हा ओढा पद्मावती ..... सहकार नगर..... सारसबाग.... भाऊ



महाराज बोळ.... जोगेश्वरी... अमृतेश्वर असा वाहायचा. ह्या ओढ्याच्या काठी अनेक जण पाणी प्यायला येत. धुणी भांडी करत. ब्राह्मण स्नानसंध्या करत. पुण्यात पेशवाई आली आणि पुणे वाढू लागले. एकेकाळी गावाबाहेरून वाहणारा हाच आंबिल ओढा थोडा अडचणींचा वाटू लागला. सन १७५२ मध्ये ह्या आंबिल ओढ्याला अचानक पूर आला. त्याच्या काठी असलेले अनेक जण त्यात वाहून गेले. या घटनेनंतर नानासाहेब पेशव्यांनी निर्णय घेतला. आंबिल ओढ्याचा मार्ग बदलला. सारसबागेपाशी पक्की भिंत बांधली आणि आंबिल ओढ्याच्या मार्ग वळवला. आज आंबिल ओढा ह्याच मार्गाने वाहत म्हात्रे पुलाजवळ नदीला मिळतो. पार्वतीच्या खालच्या बाजूने आंबिल ओढा वाहू लागला. पूर्वीच्या ओढ्याच्या मार्गावर रस्ते झाले. इमारती झाल्या. पुणे पश्चिमेस वाढू लागले. एकेकाळी भर गावातून वाहणाऱ्या ह्या ओढ्याची आठवण मात्र पुणेकर विसरून गेले.

***संदर्भ : हरवलेले पुणे, अविनाश सोवनी***

# काटकसर आणि असा एक सामाजिक प्रवास

• सौ. अनुपमा जोशीराव
भ्रमणध्वनी – ९८९०९७५४०८

**गो**ष्ट आहे १९९० सालची, मी नुकतीच बारावी पास झाले होते. स.प. महाविद्यालयातील भारावलेले, मंतरलेले दिवस होते ते. अभ्यास, मौज-मजा सर्व काही चालू होते, अशावेळी अचानक सामाजिक कार्य करणाऱ्या ''ज्ञानप्रबोधिनी'' ह्या संस्थेशी परिचय झाला. संस्थेचे नाव ऐकून होते पण प्रत्यक्ष जाणे कधी झाले नव्हते.

त्यावर्षी संस्थेच्या 'प्रचिती' गटाने नवीन प्रकल्प हाती घेतला होता. प्रकल्पाचे नाव होते 'पडसरे, १०० दिवसांची शाळा' नावच खूप वेगळे वाटले आणि माझी पाऊले नकळत तिकडे वळली. काहीही झाले तरी मीटिंगला जायचेच हे मनाने पक्के केले, ठरल्याप्रमाणे मीटिंगला गेले.

मीटिंग मध्ये प्रकल्पाबद्दल संपूर्ण माहिती देण्यात आली. हे एक सामाजिक कार्य असल्यामुळे आपला खर्च आपण करणे आवश्यक आहे. ज्यांना हे शक्य असेल त्यांनी सहभागी व्हावे, असे सांगण्यात आले. एकूण खर्च रुपये १५०/- म्हणजे जाण्या-येण्यासाठी रुपये १४०/- आणि रुपये १०/- जास्तीचे.

'पडसरे', हे आदिवासी गाव 'पाली' गावाच्या जवळ आहे. तिथे पोचण्यासाठी खूपच द्राविडी प्राणायम करावे लागत असे. स्वारगेटहून सकाळी ७ वाजताची बस पकडावी लागे. त्याचे तिकीट होते रुपये ४५/- घर ते स्वारगेट रुपये १५/-, रुपये १०/- पाली ते पडसरे फाटा, (जाताना रु. ७०/-, येताना रु. ७०/-) तिथून पुढे जंगलातून ५ कि.मी. आत चालत जाणे असा हा प्रवास करून संध्याकाळी ५ वाजता गावात पोचणे. पुढील तीन दिवस मुलांना शाळेत शिकवणे, मग पाचव्या दिवशी परतीचा प्रवास करणे.

अशी सर्व कहाणी ऐकल्यानंतर अर्थातच आईचा आणि आजीचा माझ्या जाण्याला विरोध होता. मनातून मला खात्री होती की दादा (माझे वडील) मला जाऊ देतील, तसेच झाले ते हो म्हणाले पण इतका खर्च आहे हे कसे सांगायचे, ह्या विचारात मी असतानाच त्यांनी विचारले, ''किती खर्च येणार आहे.'' मी लगेच सांगितले त्यांनी पण लगेच पैसे दिले. मी खुशीतच माझ्या कामाला लागले. मी मनात पक्के ठरवले होते काही झाले तरी उरलेले रु. १०/- नक्की परत आणायचे.

मनात ठरवले होते त्याप्रमाणे केले खूप आनंद झाला. शाळेतले काम पण मस्त झाले होते ना, डबल आनंद होता, पण एक चिंता होती, म्हणजे प्रकल्पाचे काम शक्यतो जमत असेल तर वर्षातून चार वेळा करावे असे आवाहन करण्यात आले होते. मला आवाहन मोडवत नव्हते. खर्चाची चिंता होती, घरी आल्यावर दादांशी बोलले, त्यांना म्हटले ''मला खर म्हणजे हे काम करायचे आहे, पण खर्च जास्त आहे''. ९० साली रु. १५०/- हे खूप होते. दादांनी मला उलट प्रश्न विचारला, ''मग कसे करूयात'', मी म्हटले, ''मला दुसऱ्या ट्रिपसाठी पैसे द्याल का, मग ठरवते काय करायचे ते'', माझा पडलेला चेहरा पाहून ते म्हणाले, ''बघ अस करूयात का, दुसऱ्या ट्रिपसाठी मी तुला पैसे देतो, तोपर्यंत तू एखादी छोटी नोकरी बघ, तुझ्याकडे तसा वेळ असतो, जो पगार मिळेल तो तू ह्या कामासाठी खर्च कर, त्याला आपण, 'कमवा आणि शिका असे म्हणण्यापेक्षा ''कमवा आणि सामाजिक कार्य करा'' असं म्हणूयात.

मला ही कल्पना एकदम पसंत पडली. माझे विचारचक्र चालू झाले आणि एकदम लक्षात आले. माझा नुकताच बालभवनचा कोर्स ही झाला होता व घराजवळ नुकतेच 'बालरंजन क्रीडांगण' चालू झाले होते. मनात आले तेथे जाऊन विचारावे, कोणी मदतनीस हवी आहे का, मग काय गेले विचारायला, चांगल काही करायचं ठरवलं की देवही आपल्या पाठीशी उभा राहतो ह्याची प्रचिती आली. मला ती नोकरी मिळाली. महिन्याला रु. ७०/- असा पगार ठरला. माझा आनंद गगनात मावेना, माझी सगळी चिंताच मिटली.

धावत धावतच घरी आले. लगेच पैशांचा ताळमेळ करायला बसले. आता तीन महिन्यांनी एकदा मी पडसऱ्याला जाऊ शकत होते. तीन महिन्यानंतर माझ्याकडे स्वकष्टाचे रु. २१०/- असणार होते. रु. १४०/- जाण्या-येण्याचे रु. १०/- मुलांसाठी खाऊ रु. १०/- जास्तीचे, रु. ५०/- साठवण. दादांना हे सर्व सांगितले ते फक्त हसले. ते तेव्हा का हसले ते आता मला कळतय. कारण त्यांनी मला बचतीचे महत्त्व काय हे तर शिकवलेच शिवाय कोणत्याही कठीण प्रसंगाला न घाबरता सामोरे जाण्याची जिद्दही शिकवली.

ठरलं सगळं पण काम करायला लागलो म्हणजे रजा घेणे आले. मग आमच्या मुख्य ताईंना मी ही नोकरी का व कशासाठी करते आहे हे नीट समजावून सांगितले. त्यांनाही हे काम खूप आवडले, त्यांनी मला रजा द्यायचे मान्य केले, मी पण जेव्हा जोडून सुट्ट्या असतील (कॉलेज व क्रीडांगण) तेव्हाच पडसरे येथे जाण्याचा प्लॅन करू लागले.

हा माझा प्रवास १९९५ सालापर्यंत अव्याहत चालू होता. क्रीडांगण सोडले त्यावेळी मिळणारा पगार रु.१५० इतका झाला होता. मात्र रु. ५०/– ह्या बचतीचा प्रवास तेव्हाही आणि आताही तसाच चालू आहे.

ह्या विषयाच्या अनुषंगाने सहज मागे वळून पाहिले तर 'पडसरे' येथे जाण्यासाठी केलेली ती सर्व धडपड डोळ्यासमोरून तरळून गेली.

ज्ञानभाषा मराठी प्रतिष्ठान
Emai: anupama.joshirao@gmail.com

## वाचकांचा पत्रव्यवहार

**हॅलो विजयजी**

आत्ताच आपल्या प्रतिष्ठानचे सुरेश मराठे येऊन गेले. आपली भेट व पत्र मिळाले. खरोखरच आपण हा सुंदर उपक्रम चालू केला आहे. अजूनही बाबा आपल्यात नाहीत हे वाटतच नाही. हळू हळू ह्या दुःखातून बाहेर यायचा प्रयत्न करतोय, त्यांचे कार्य फारच मोठे होते. गेले २५ वर्षे ते भगवत् गीतेवर प्रवचन करत होते व हि सर्व प्रवचने youtube वर रेकॉर्ड पण करून ठेवली आहेत त्याची लिंक पण पाठवीन. आपल्या आपुलकीबद्दल खूप खूप धन्यवाद व सर्वांस दिवाळीच्या शुभेच्छा!

– **विनय मराठे**, *मराठे इन्फोटेक, ठाणे*

**विजयजी नमस्कार,**

माझ्या भावाच्या घरी दिवाळी फराळ मिळाला, हा स्तुत्य उपक्रम आहे. यामुळे परिवारातील लोकांना आधार मिळतो.


या उपक्रमा साठी आपले व सर्व सहकारी यांचे खुप खुप आभार.

धन्यवाद.

**उपेंद्र मराठे**, पनवेल.




**'मराठे प्रतिष्ठान'चे भूतपूर्व कार्यवाह व भूतपूर्व विश्वस्त श्री. मोहनराव मराठे (खार) यांनी कोरोना काळामध्ये चित्रकारी शिकायला सुरुवात केली व सदर चित्र हे त्यांचे २००वे चित्र आहे.**



**कुमुद ताई डोके यांची अप्रतिम चित्रकला.**



# लघुउद्योजकांचा आधारवड!

• एकनाथ सोनवणे भ्रमणध्वनी – 0000000

देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या लघुउद्योजकांना शासनाच्या लालफितशाहीकडून भेडसावणाऱ्या अडचणी आणि इतर समस्यांतून मार्ग काढण्यासाठी संघटित होण्याचा मार्ग दाखविणारे ठाण्यातील ज्येष्ठ लघुउद्योजक डॉ. मधुसुदन उर्फ आप्पा खांबेटे यांच्या निधनाने राज्यातील लघु उद्योजकांचे एक खंबीर नेतृत्व हरपले आहे.



डॉ. मधुसुदन खांबेटे

२०१७ मध्ये वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू झाला. त्यापूर्वी देशभरात प्रचलित असलेले विविध प्रकारचे १७ अप्रत्यक्ष कर रद्द होऊन एकच सामायिक करप्रणाली अंमलात आली. मधुसुदन खांबेटे यांनी 'टीसा' आणि 'कोसिआ' या संघटनांच्या माध्यमातून तीन दशकांहून अधिक काळ केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले. त्यानंतरही आप्पा खांबेटे स्वस्थ बसले नाहीत. या कर प्रणालीच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीतील अडचणी त्यांनी वित्त मंत्रालयाच्या लक्षात आणून दिल्या. तसेच, चर्चासत्रे आणि कार्यशाळा भरवून उद्योजकांना या कराविषयी माहिती दिली.

डॉ. आप्पासाहेब खांबेटे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील अंजर्ले या गावात स्वातंत्र्यापूर्वी झाला. त्यांचे वडील कोलकाता येथील मायर्स पंपमध्ये व्यवस्थापक होते. त्यामुळे त्यांचे प्राथमिक शिक्षण गुजराती माध्यमाच्या शाळेत (१९३८ ते १९४२) झाले. त्यांना इंग्रजी, हिंदी आणि मूळ भाषा मराठी याव्यतिरिक्त गुजराती आणि बंगाली अस्खलितपणे येत होत्या.

नागपूर आणि मुंबईत मेट्रिक आणि इंटर मिडिएटपर्यंत शिक्षण पूर्ण करून ते पुन्हा कोलकत्यात गेले. तिथे त्यांनी इलेक्ट्रिकल आणि मॅकेनिकल इंजिनीअरिंग या दोन्ही पदविका घेतल्या. त्यानंतर काही काळ शिकाऊ म्हणून त्यांनी काम केले. त्यांच्या कामातील प्रगती पाहून कंपनीने त्यांना आठ महिन्यांच्या प्रशिक्षणासाठी इंग्लंडला पाठवले. ते प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर कंपनीने त्यांच्यावर 'आर अँड डी' विभागाची जबाबदारी सोपवली. त्यांनी व्हॅक्यूम आणि एअर ब्रेक्सवर (ईएमयू-इलेक्ट्रो मॅग्नेटिक युनिट) लक्ष केंद्रित केले. कामाचा भाग म्हणून आप्पा खांबेटे यांनी रेल्वेच्या पेरंबूर येथील इंटिग्रल कोच फॅक्टरी, जमशेदपूर येथील टाटा लोकोमोटिव्ह वर्क्स आणि वाराणसी येथील डिझेल लोकोमोटिव्ह वर्क्सला भेटी दिल्या. याच काळात नोकरीपेक्षा स्वतःचा उद्योग सुरू करण्याचा विचार त्यांच्या मनात आला. वयाच्या अवघ्या ३२व्या वर्षी जिवलग मित्र एस.व्ही. जोशी आणि श्याम बिहारीसिंग यांच्यासोबत आप्पा खांबेटे यांनी स्वतःची कंपनी सुरू केली.

१९६३ ते १९६५ दरम्यान खांबेटे यांनी स्वउद्योग वाढीसाठी खूप मेहनत घेतली. पुढे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या बंगालमधील प्रभावामुळे तिथे नवीन गुंतवणूकदार येणे बंद झाले आणि अनेक उद्योजकांनी गाशा गुंडाळला. आप्पा खांबेटे यांनीही कुटुंबीय आणि मित्र मंडळींच्या आग्रहाखातर मे. एस. के. जी इंजिनीअर्स नावाने स्थापन केलेल्या आणि भरभराटीस आलेल्या उद्योगातील भागीदारी जड अंतःकरणाने मागे घेतली. ती कंपनी अजूनही सुरू आहे.

ठाण्यातील वागळे इस्टेटमध्ये वडील रामकृष्ण यांच्या नावाने १९६९ मध्ये मे. रामसन इंजिनीअर्स या नावाने त्यांनी कंपनी सुरू केली. येथील उद्योजकांना भेडसावणाऱ्या समस्या आणि अडचणी सोडविण्यासाठी इतर सहकारी उद्योजकांसोबत त्यांनी १९७४ मध्ये ठाणे स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनची (टीसा) स्थापना केली. १९८३ मध्ये एक रुपया चौ. मी. दराने टिसाला भूखंड मिळाला तेव्हापासून महाराष्ट्रातील प्रत्येक एमआयडीसी विभागात एक रुपया चौ. मीने लघुउद्योकांच्या संघटनांना भूखंड मिळू लागले.

ठाण्यात १९७८ मध्ये टीसाने आयोजित केलेल्या पहिल्या लघुउद्योजकांच्या परिषदेत तत्कालीन मंत्री जॉर्ज फर्नांडिस, सुशीलकुमार शिंदे, भाऊसाहेब हिरे उपस्थित होते. 'टीसा'च्या माध्यमातून जिल्ह्यातील आणि राज्यातील उद्योगांसाठी काम करत असतानाच राष्ट्रीय स्तरावरील प्रश्न सोडविण्यासाठी आप्पा खांबेटे यांच्या पुढाकाराने 'चेम्बर ऑफ स्मॉल इंडस्ट्री असोसिएशन्स'

(कोसिआ) या लघुउद्योजकांच्या राष्ट्रीय शिखर संस्थेची १९९० मध्ये स्थापना झाली.

उद्योगांना लागणारे कुशल कर्मचारी मिळण्यासाठी ‘चेम्बर ऑफ स्मॉल इंडस्ट्री असोसिएशन्स’ या अखिल भारतीय संस्थेच्या माध्यमातून ठाणे लघुउद्योग संघटना समाजातील गरीब, गरजू लोकांसाठी मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबवते. आतापर्यंत याचा लाभ हजारो तरुण-तरुणींनी घेतला असून त्यातील काहीजणांनी त्यांचे स्वयंरोजगारही सुरू केले आहेत.

केंद्र सरकारच्या लघुउद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत असणाऱ्या राष्ट्रीय लघुउद्योग बोर्डावर ‘कोसिआ’च्या संस्थेच्या माध्यमातून डॉ. खांबेटे यांची २०१२ ते २०१४ दरम्यान निवड झाली होती. तब्बल सहा दशके सार्वजनिक जीवनात कार्यरत असणाऱ्या आप्पा खांबेटे यांनी लघु उद्योजकांच्या अनेक अडचणी सोडवल्या. त्यांना प्रशिक्षित केले. संघटित होऊन प्रश्न मांडण्यास शिकवले. या प्रदीर्घ वाटचालीत त्यांना ठाणे भूषणसह अनेक पुरस्कार लाभले.

*(लेखक ठाण्यातील लघु उद्योजक असून ‘टीसा’ संघटनेत कार्यरत आहेत.)*

♦

---

सन २०२१ च्या दिवाळी सणाच्या अगोदर पुणे कार्यकारी मंडळाच्या सदस्यांना असं सुचलं की आपल्या परीवारातील ज्या कुटुंबात या वर्षभरात व्यक्ती निधन पावल्या असतील त्यांचेकडे आपण परीवाराकडून दिवाळी फराळ द्यावा. त्याप्रमाणे पुणे येथे हा उपक्रम राबवला गेला. याला मिळालेल्या प्रतिसादामुळे यंदा ठाणे येथे हा उपक्रम राबवला. ‘प्रतिष्ठान’चे उत्साही कार्यकर्ते श्री. सुरेश मराठे यांनी तीन घरी फराळ नेऊन दिला. या तिघांच्या प्रतिक्रिया व सुरुवातीला विश्वस्त श्री. आनंद मराठे यांची कौतुकाची थाप.

**माननीय अध्यक्ष श्री. विजयजी**

आपणास, आपल्या समस्त परीवारास दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!!

पत्रास कारण...

या वर्षांपासून आपण व आपल्या सहकाऱ्यानी (उदा.हेमंतजी/शैलेन्द्रजी/श्रीनिवासजी)

एक स्तुत्य आणि आदर्श उपक्रम सुरू केलात. यंदा आपल्या परिवारातील (ज्यांचे देहावसान झाले) त्यांच्या घरी आपण समक्ष अथवा आपले सहकारी जाऊन आलात.

आपण त्याना पत्र + फराळ देऊन, त्या परिवारास आपण त्यांच्यासोबत आहात हे आश्वस्त केले.

आपल्या या उपक्रमामुळे, आपल परिवाराप्रति असलेल प्रेम/ कळकळ/आस्था यांचं प्रामाणिक दर्शन झालं.

कौतुक हा शब्द फारच तोकडा आहे. भविष्यात हा उपक्रम अव्याहत सुरू रहावा, अशुद्ध व्याकरण, लेखनाची सवय शून्य भावना प्रामाणिक आहेत.

**- श्री आनंद मराठे**
*विश्वस्त मराठे प्रतिष्ठान*

# वाचकांचा पत्रव्यवहार

आत्ताच आपल्या परीवारातर्फे दिवाळी फराळ मिळाला. सुरेश ने आणून दिला. खूप छान वाटले. नुसतेच आपल्या दुःखात सहभागी आहोत म्हणणारे खूप भेटतात. पण खरच त्याची जाणीव करून देणारे आपल्या या परिवारासारखे कोणीच नाही. एवढा आठवणीने लक्षात ठेवून मला फराळाचे आणून दिले. खरे तर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत. एवढेच म्हणेन सदैव असेच माझ्या सोबत रहा. धन्यवाद म्हटले तर परकेपणा येईल...पण मनापासून आभार मात्र नक्कीच मानेन मी.

तुमचीच..
**संध्या खांबेटे**

---

## प्रकाशझोत व्याजदरातील चढउतारावर

या पुस्तकातून लेखकाने १०१७ ते फेब्रुवारी २०२२ या काळातील पतधोरणाचे विश्लेषण केले आहे. पतधोरण म्हणजे काय आणि त्याचा दैनंदिन व्यवहाराशी कसा संबंध येतो, हे सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा लेखकाचा हेतू रिझर्व्ह बँक आणि पतधोरण यांचे नाते काय आहे, करोनाकाळात देशात कोणत्या घटना घडल्या. २०१७ ते २०२२ या काळात अर्थव्यवस्था कशी होती, याबाबतची वस्तुस्थिती यातून समजते.

• **लेखक :** जयंत मराठे •
**प्रकाशक :** नावीन्य प्रकाशन
• **पाने :** १६० •
**किंमत :** २३०/- रु.

# साभार पोच




**'आयुष्य हे ऽऽऽ**

• **लेखिका** : सौ. माधवी सदानंद आपटे
• **प्रकाशन** : २४ सप्टेंबर. २०२२ • **प्रकाशक** : समर्थ क्रिएशन, मनिषा, १६४, श्रीकृष्णनगर, बोरिवली (पूर्व) मुंबई - ४०००६६
• **भ्रमणध्वनी** : ९८२०७७९३२५/९९२०५३४७९२
• खाजगी वितरणासाठी • **पृष्ठसंख्या** : १६७


---




**दिव्य भरारी**

**लेखिका** : शोभा नाखरे
• **प्रकाशन** : रामचंद्र प्रतिष्ठान, आशिर्वाद, चितळे पथ, दादर, मुंबई ४०० ०२८
• पृष्ठसंख्या : ९६ • मूल्य : रु. १५०/-


---




**दिवाळी अंक – किरात** – दिवाळी २०२२

• **संपादिका** : सौ. सीमा शशांक मराठे, साप्ताहिक किरात, ९२/२, खर्डेकर पथ, वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग - ४१६ ५१६
• भ्रमणध्वनी : ९४०३३६४७६४
• रुपये : १५०/- • पृष्ठसंख्या : १५८

---




**स्वातंत्र्यवीर – दिवाळी विशेषांक २०२२**

• **संपादक** : श्री. शंकर दत्तात्रय गोखले
स्वातंत्र्यवीर सावरकर साहित्य अभ्यास मंडळ, मुंबई
• **भ्रमणध्वनी** : ९८९२२०२४८१
• **पृष्ठसंख्या** : २०० • **मूल्य** : रु. २००/-

---


WORLD'S GREATEST RECORD
India Edition
Certificate
Mr. Moreshwar Marathe
The record of ACQUIRING MAXIMUM NUMBER OF DIPLOMAS IN ENGINEERING STUDIES AND ASTROLOGY STUDIES is set by Mr. Moreshwar Marathe (Born on 24 October 1975) from Thane, Maharashtra, India. He has a total of 35 diplomas on credit in his respective studies. He is also a member of various organizations that promote and create awareness for engineering studies. He has achieved an extraordinary feat in the field of Research and Development. This is in recognition of his amazing talent and hard work.
S. No. - 0008919 Issuance : 1 September 2022
Mr. K. Kaushik
Adjudicator
www.worldgreatestrecord.com

## हार्दिक अभिनंदन!

**मोरेश्वर चिंतामण मराठे यांनी आजवर ३५ डिप्लोमा मिळवले आहे. 'मराठे प्रतिष्ठान'कडून खूप खूप अभिनंदन**




---

**पत्रव्यवहाराचा पत्ता** : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१
भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२ • इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**